बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १५१ वा | शुक्रवार दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत आविष्कार रा. आवारपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२०.०८.२०२५ रोजी २०.१५ वा. सु. आवारपिंपरी येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी कोयता अंदाजे १०० किंमतीचा विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला परंडा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद कोयता जप्त करुन फिर्यादी नामे- फिरोज शेख पोलीस हावलदार नेमणुक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४, २५ अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### दरवाजापुढे करुनझोपले असता सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रियंका दत्तात्रय ढवरे, वय ३० वर्षे, रा. दाउतपुर ता. जि. धाराशिव ह.मु.समता नगर धाराशिव ता. जि. धाराशिव या माहेरी कोळेकरवाडी येथे घरातील सर्वजन दरवराजा पुढे करुन झोपले असता अज्ञात व्यक्तीने घराचा दरवाजा उघडून प्रियंका यांचे बॅगमधील ९४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ३,००० रोख रक्कम असा एकुण २,८१,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रियंका ढवरे यांनी दि.१९.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ११ शेतकरी यांचे केबल वायर, मोटारची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बिभीषण पांडुरंग कोल्हे, वय ३८ वर्षे, रा. हावरगाव ता.कळंब जि. धाराशिव यांचे हावरगाव शिवारातील शेत गट नं १३९ व १४५ मधील फिर्यादी व इतर ११ शेतकरी यांचे केबल वायर, मोटार असा एकुण ५३,०८० किंमतीचे साहित्य हे दि.११.०८.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बिभीषण कोल्हे यांनी दि.१९.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कडी कोंडा तोडून केली चोरी

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :फिर्यादी प्रभु भुजंग गणगे, वय ७० वर्षे, रा. सोनगिरी ता. भुम जि. धाराशिव यांचे राहते घराचे रुमचा कुलूपाचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.१७.०८.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील ४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण ३,१५,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी प्रभु गणगे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

---

धाराशिव येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमविषयक बैठक

## तृतीयपंथी व दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकेचे वाटप

### राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांची उपस्थिती



धाराशिव, दि.२० ऑगस्ट (जिमाका) राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी १८ ते २० ऑगस्ट २०२५ या कालावधीत जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी दिनांक १९ ऑगस्ट रोजी तहसिल कार्यालय, धाराशिव येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत बैठक पार पडली.या बैठकीदरम्यान धाराशिव तालुक्यातील तृतीयपंथी व दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकेचे वाटप श्री. ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. शासकीय योजनांची अंमलबजावणी, तक्रार निवारण यंत्रणा तसेच जनतेपर्यंत अन्नधान्याचे सुयोग्य वितरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.अपात्र व मयत लाभार्थ्यांची नावे वगळून पात्र लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून देणे,तृतीयपंथी व भिक्षेकरी यांनाही अन्नधान्याचा लाभ मिळावा,तसेच एकही लाभार्थी योजनेपासून वंचित राहू नये,अशा स्पष्ट सूचना श्री.ढवळे यांनी दिल्या.

याच बैठकीदरम्यान धाराशिव तालुक्यातील तृतीयपंथी व दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे,सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी निकिता साकळे, तहसिलदार डॉ.मृणाल जाधव व पुरवठा निरीक्षण अधिकारी अमोल बाहेकर उपस्थित होते. यावेळी श्री ढवळे यांच्या हस्ते दिव्यांग लाभार्थी : वसंत गणपती गंगने, चंचलाबाई ज्ञानदेव दणाणे, सिता मोहन डावकरे, अनुसया महादेव लोंढे, पल्लवी रणजित मगर, रुक्मिणी नितीन कांबळे.तृतीयपंथी लाभार्थी : तेजसिंग भूजंग पेठे, श्रावण शिवाजी वैरागे, अभिजीत रमेश निंबाळकर, नितीन अरुण बनसोडे, नेताजी विठ्ठल बडबडे, मुन्ना अजीज शेख, मोगरा युन्नुस सय्यद,आकाश प्रकाश काकडे, सागर सुरेश सरोदे या लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकेचे वाटप करण्यात आले.

---

## आदर्श महाविद्यालयात विद्यार्थी स्वागत सोहळा उत्साहात संपन्न




मुरूम (सुधीर पंचगल्ले): आदर्श महाविद्यालय, उमरगा येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने च्या वतीने पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ बुधवार दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकीचे प्राचार्य डॉ. हरिदास फेरे उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रबोधनपर मार्गदर्शनातून नवागत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. विशेषतः त्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) मधील महत्त्वपूर्ण बाबी विद्यार्थ्यांसमोर मांडून आजचा विद्यार्थी विविध कौशल्याने परिपूर्ण असने अपेक्षित आहे असे मत व्यक्त केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे बहुशाखीय शिक्षणाची संधी उपलब्ध झाली असून विद्यार्थ्यांना कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांतून स्वतंत्र अभ्यासक्रम निवडण्याची लवचिकता मिळते. ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम राबविण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना इच्छेनुसार ३ वर्षांत पदवी किंवा ४ वर्षांत ऑनर्स पदवी घेण्याची सुविधा मिळते. कौशल्य विकास, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, उद्योजकता व डिजिटल शिक्षण यावर भर देण्यात आला आहे अशा विविध घटकांना स्पर्श करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी कला, क्रीडा, संस्कृती आणि जीवनकौशल्यांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे हे अधोरेखित केले. डॉ. फेरे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, शैक्षणिक ज्ञानाबरोबरच कौशल्यविकास, तंत्रज्ञानाचे भान, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी अंगीकारली तरच आपण खऱ्या अर्थाने उद्याचे सक्षम नागरिक होऊ शकतो.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांनी भूषविले. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या संधींचा व महाविद्यालयातील विविध तज्ञ प्राध्यापक व विविध शैक्षणिक सोयी सुविधांचा योग्य फायदा करून घ्यावा, असे प्रतिपादन केले. पदव्युत्तर विभागाचे प्रभारी प्रा. शिरिष रेड्डी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे (IQ-C) समन्वयक प्रा. डॉ. सुधीर मठपती यांनी केले. संचालन प्रा. डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी तर आभार डॉ. संजय दुलगे यांनी मानले.

---

## इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महामंडळाच्या योजना

### अर्ज करण्याचे व्यवस्थापक यांचे आवाहन

धाराशिव (जिमाका) -इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळा अंतर्गत कार्यरत असलेल्या १३ उपकंपन्यांचे कामकाज आता धाराशिव जिल्ह्यात सुरु करण्यात आले आहे. या उपकंपन्यांत जगज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ (लिंगायत वाणी),संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ (गुरव समाज),संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ (न्हावी समाज),लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ (लेवा समाज),सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ (वाणी समाज), स्व.विष्णुपंत रामचंद्र दादरे आर्थिक विकास महामंडळ (लोणारी समाज), संत नामदेव महाराज शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ (शिंपी समाज),संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ (सुतार समाज),सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ (गुजर समाज),संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ (सोनार समाज),संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (तेली समाज),संत श्री.रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ (बारी समाज) आणि आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ (आगरी समाज) यांचा समावेश आहे.

महामंडळामार्फत सध्या सहा योजना राबवल्या जात आहेत.त्यापैकी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना,गट कर्ज व्याज परतावा योजना,शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना आणि महिला स्वयं सिद्धी व्याज परतावा योजना या पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात आहेत.पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह ृ.ीललषवल.ीस या पोर्टलवर अर्ज करणे अनिवार्य आहे. तर २० टक्के बीजभांडवल योजना व थेट कर्ज योजना या ऑफलाईन स्वरूपाच्या असून त्यांचे अर्ज जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहेत.

या योजना अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी जिल्हा व्यवस्थापक वृषाली लहारे यांनी आवाहन केले आहे.अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीजवळ, औरंगाबाद रोड,धाराशिव येथे अथवा दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२३८६३ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

## धाराशिव विभागातील एस.टी. महामंडळाचा जनसेवा उपक्रम; समाजातील विविध घटकांनी घेतला प्रवास सेवेचा लाभ

- १ कोटी ३३ लक्ष महिलांनी घेतला सन्मान योजनेचा लाभ
- १ कोटी २६ लक्ष ज्येष्ठ नागरिकांना लाभ

धाराशिव,दि.२० ऑगस्ट (जिमाका) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (धाराशिव विभाग) तर्फे विविध सामाजिक घटकांना दिल्या जाणाऱ्या सवलतीमुळे लाखो प्रवाशांना प्रवाससुविधा मिळाल्या आहेत.एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या आर्थिक वर्षात विभागामार्फत चालनात असलेल्या एस.टी.बसने विविध घटकातील नागरिकांनी प्रवास करून या योजनेचा लाभ घेतला आहे.

यामध्ये ९७ हजार ४५२ विद्यार्थी शालेय व महाविद्यालयीन प्रवासासाठी लाभार्थी ठरले.महिलांच्या सन्मानासाठी सुरू केलेल्या महिला सन्मान योजनेचा तब्बल १ कोटी ३३ लक्ष ९४ हजार ६५४ महिला प्रवाशांनी लाभ घेतला आहे.समाजातील वयोवृद्ध घटकांनाही या योजनेतून मोठा दिलासा मिळाला आहे. त्यानुसार ६५ ते ७५ वयोगटातील १६ लक्ष ४० हजार ८५८ ज्येष्ठ नागरिकांनी सवलतीत प्रवास केला,तर ७५ वर्षांवरील १ कोटी २६ लक्ष ५ हजार ८१० अमृत जेष्ठ नागरिकांनी मोफत प्रवासाचा लाभ घेतला.या सर्व लाभार्थ्यांचा मिळून एकूण आकडा तब्बल २ कोटी ७७ लक्ष ३८ हजार ७७४ इतका झाला आहे.

यासोबतच प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर आणि आरामदायी होण्यासाठी धाराशिव विभागात नवनवीन बसगाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यात ५५ नवीन लालपरी बस तसेच पर्यावरणपूरक ५ ई-बस प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्या आहेत.यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर तर होतोच,शिवाय प्रदूषण नियंत्रणातही हातभार लागत आहे.

धाराशिव विभागाने दिलेल्या या आकडेवारीवरून एस.टी.महामंडळाची सामाजिक बांधिलकी अधोरेखित होते. विद्यार्थ्यांपासून ते महिला आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व घटकांसाठी सुरू असलेल्या या सेवा ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना मोठा आधार ठरत आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर ही माहिती जाहीर करताना,विभागाने जनतेसाठी सुरक्षित,स्वस्त व सुलभ प्रवास हीच आपली प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले आहे.

---

## आरपीआय डेमोक्रॅटिक पक्ष पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

### संतोष धावारे, दालुज अली, अक्षय झोंबाडे यांची निवड



धाराशिव (प्रतिनिधी)- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) पक्षाने जिल्ह्यातील महत्वाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर केल्या आहेत.धाराशिव कामगार विभाग जिल्हाध्यक्षपदी संतोष धावारे, धाराशिव अल्पसंख्यांक विभाग जिल्हाध्यक्षपदी दालुज अली, तर कामगार विभाग तालुकाध्यक्ष पदी अक्षय झोंबाडे यांची नियुक्ती केली आहे.

जिल्हाध्यक्ष राज धज यांनी मंगवारी १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी धाराशिव येथील पक्ष कार्यालयात नूतन पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.राष्ट्रीय अध्यक्ष नंदा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आणि राष्ट्रीय युवक अध्यक्ष कनिष्क कांबळे मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

आरपीआय (डेमोक्रॅटिक) पक्ष स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या दृष्टीने संघटन मजबुतीकडे वाटचाल करत असून, नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करून पक्ष विस्तार करावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष राज धज यांनी यावेळी केले.यावेळी युवक अध्यक्ष अनिल वाघमारे, अमोल पेठे, अजय माने, कौतुक माने, अक्षय कांबळे यावेळी उपस्थित होते.

---

## धाराशिवमध्ये मंजिरी सखीच्या वार्षिक सभेत महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर

धाराशिव,दि.२१ ऑगस्ट (जिमाका) स्वयं शिक्षण प्रयोग संस्था अंतर्गत मंजिरी सखी प्रोड्युसर कंपनीची वार्षिक सभा १४ ऑगस्ट रोजी स्वागत मंगल कार्यालय, शेकापूर रोड,धाराशिव येथे पार पडली.या निमित्ताने महिलांच्या आरोग्यासाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,डॉ.के.के.मिटकरी,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रमोद गिरी, डॉ.एस.एस. शेरखाने,डॉ.ए.ए.लोखंडे यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या शिबिरात महिलांची विनामूल्य हिमोग्लोबिन (Hb) तपासणी HEMO QR पद्धतीने करण्यात आली. शिबिरात एकूण ३६९ महिलांची तपासणी झाली.

तालुका आशा समन्वयक सचिन तटाळे व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक श्री.अमित गाडे यांनी महिलांना ॲनिमिया प्रतिबंध, संतुलित आहार आणि नियमित तपासणीचे महत्त्व पटवून दिले.तसेच अवयवदान मिशन संदर्भात माहिती देत अवयवदानाचे महत्त्व,प्रक्रिया व त्यातून वाचू शकणाऱ्या जीवांविषयी जागरूकता निर्माण केली.या उपक्रमात आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविकांनी सक्रिय सहभाग घेत, तपासणी व जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

---

## अनेक शेतकऱ्याच्या पानबुडी व केबलची केली चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रमोद शहाजी मुळीक, वय २८ वर्षे, रा. हावरगाव ता. कळंब जि. धाराशिव यांचे हावरगाव शिवारातील शेत गट नं १४० व १४३ मधील संजीवनी कंपनीची पानबुडी व २० फुट केबल, शिवाजी कोल्हे यांची लाडा लक्ष्मी पाच एच पी पानबुडी व ७० फुट केबल, बालाजी कोल्हे यांची लाडा लक्ष्मीण पाच एच पी कंपनीची पानबुडी मोटर व ५० फुट केबल, आश्रुबा कोल्हे यांची लक्ष्मी कंपनीची पाच एच पी पानबुडी व १०० फुट केबल, असा एकुण ६०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.१७.०८.२०२५ रोजी २१.०० ते दि. १८.०८.२०२५ रोजी १४.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रमोद मुळीक यांनीदलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## व्यक्तीकडे जनता आकर्षित होते

बेस्ट एम्प्लॉइज को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या संयुक्त उत्कर्ष पॅनेलच्या पराभवाला कर्मचाऱ्यांची नाराजी कारणीभूत ठरली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या एकीची ही पहिली चाचणी म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जात होते. आता महापालिका निवडणुकीतील कामगिरीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या निवडणुकीत कामगार नेते शशांक राव यांच्या पॅनेलचे १४ उमेदवार निवडून आले . तर आमदार प्रसाद लाड यांच्या पॅनेलचे सात जण विजयी झाले. ठाकरे बंधूंच्या पॅनेलचा एकही उमेदवार यशस्वी झाला नाही. शिवसेनेला जो फटका बसला त्याचे आता विश्लेषण सुरू आहे. बेस्ट उपक्रमात २०१९ मध्ये कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपातून पहिल्याच दिवशी शिवसेनेने माघार घेतली होती. त्याचा रोषही कर्मचाऱ्यांच्या मनात कायम होता. शिवसेनाप्रणीत बेस्ट कामगार सेनेत सुरू असलेला एककल्ली कारभार, उपक्रमातील संघटनेतील नेतृत्वात न झालेला बदल, मुंबई महापालिकेत अनेक वर्षे सत्तास्थानी असतानाही बेस्ट उपक्रमावर ओढवलेली हलाखीची स्थिती, निवृत्त कर्मचाऱ्यांची रखडलेली देणी आदींमुळे नाराजीचा स्फोट निकालातून दिसला. त्यातच उमेदवारी अर्जांच्या वेळी माघारीमुळे काही मंडळींनी उघडउघड, तर काहींनी छुप्या पद्धतीने बंडखोरी केली. त्याचा फटका निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या संयुक्त उत्कर्ष पॅनेलला बसला. मुळात जनतेला चांगली कामे करणारे हवेत. पुर्वी एकच विचार होता तो आत दिसून येत नाही. पुर्वी काही झाले तरी काँग्रेसकडे जनता झुकली जात होती. गांधींजींचा पक्ष, इंदिराजींचा पक्ष म्हणून आकर्षिली जात होती. बाकी कांही देणे-घेणे जनतेला नव्हते. त्यामुळे जनता काँग्रेसकडे वळली जात होती. नंतर भाजपा एक पर्याय निर्माण झाला. भाजपाने देशात विकासाचा गुजरात पॅटर्न दाखविला. काँग्रेसकडे अनेक राज्य होते मात्र गुजरात सारखा पॅटर्न दाखविता आला नाही. त्याचा परिणाम भाजपाने सत्ता खेचली. भाजपाने एकदा पकड धरली तर सहसा ते सोडत नाहीत. ते सतत जनतेची नाडी ओळखून काम करतात. यामुळे अनेक राज्य काँग्रेसच्या ताब्यात होती ती परत भाजपाा मित्रपक्षाने मिळवली. भाजपा एक मोठा पक्ष देशात आहे. काँग्रेसने ज्या चुका केल्या त्या सुधारण्याकडे दुर्लक्ष होत गेले. आज काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडी निर्माण केली तरी त्याचे काम जनतेसोबत असणे आवश्यक आहे. यात सक्रियाता कमी दिसून येते. आज जे भिषण प्रश्न आहेत त्याकडे दुर्लक्षित केले जाते. उदा. घ्यायचे झाले तर एक महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली आहे. शेतकरी व शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अजून मदती बाबत कोणीतेही पावले उचलली नाहीत. वास्तविक महाराष्ट्रात मोठ्या सणाची रेलचेल आहे. मोठ्या प्रमाणात महागाई वाढली आहे. अशा स्थितीत काँग्रेस काय करीत आहे. केवळ राहुल गांधी यांचे लक्ष बिहार निवडणुकीकडे दिसून येते. केवळ निवडणुकीसाठी काम करणार असाल तर ते योग्य नाही. काँग्रेसचे ज्या राज्यात निवडणुका आहेत तेथेच परिश्रम घेतले जात आहे. निवडणुका झाल्या की, परिस्थिती पुर्वी सारखी दिसून येते. गुजरात राज्यात विधानसभेची निवडणुक झाली नंतर राहुल गांधी कितीवेळा गुजरात राज्यात गेले. किती संघटन मजबुत केले याचा विचार काँग्रेसपक्ष करीत नाही. त्यामुळे जनता दुरावली जात आहे. काँग्रेसने तळागाळातील कार्यकर्त्यांचे संघटन वाढविले पाहिजे. तळागाळातील कार्यकर्ते त्यांचा मान सन्मान दिला पाहिजे. ते होत नाही. राहुल गांधी यांचा थेट संबंध तळागाळातील कार्यकर्त्याशी असला पाहिजे. भाजपाचे जसे सक्रिय कार्यकर्ते आहेत, तसे काँग्रेसने निर्माण केले पाहिजेत. काही झाले तरी जो पर्यंत जनतेचा आशिर्वाद मिळत नाही तो पर्यंत जनता आकर्षिली जाणार नाही. लवचिक धोरण काही कामाचे नाही. मुंबईत अधिक प्रमाणात शिवसेना आहे त्याच प्रमाणे मनसेचे वर्चस्व आहे. बेस्टच्या निवडणुकीत काय घडले. जनतेत प्रचंड नाराजी आहे. अनेक वर्ष दुर राहीलेले दोघे भाऊ अचानक का जवळ येतात. अनेक वर्ष मराठी माणसावर झालेल्या त्रासा बाबत विचार केला नाही. कधी नाही असे स्वप्नात देखिल वाटले नव्हते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनतील. ते बनल्यानंतर शिवसेना मोठ्या प्रामणात वाढली पाहिजे होती. उलट शिवसेनेचे तुकडे झाले. मातब्बर मंडळी विभक्त झाली. का झाली? यामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. कोणत्या कारणामुळे एकनाथ शिंदे यांचा गट निर्माण झाला. केवळ आणि केवळ भाजपाला सत्ता मिळाली ती शिंदे यांच्या बंडखोरीने! व सत्तेत शिरकाव झाला याचे श्रेय एकनाथ शिंदे यांच्याकडे जाते. एकनाथ शिंदे सह त्यांच्या गटाला फुटण्यापासून उद्धव ठाकरे यांनी वाचविले असते तर आज भाजपा सत्तेत दिसून आली नसती. नंतर ही सत्ता मिळविता आली नसती. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यामुळे सेनेचे मोठे नुकसान झाले. बेस्टच्या निवडणुकीत अपयश आले. एखादी चुक राजकारणात किती महागात पडू शकते हे कळून आले आहे. जो पक्ष जनतेसोबत आहे त्यांनाच जनता स्विकारते. त्यामुळे बेस्टचा निकाल पहाता विरोधकांनी विचार केला पाहिजे. आगामी काळात देशातील सर्वात मोठी आर्थिकदृष्टया महत्वाची निवडणुक मुंबई महानगर कडे पाहिली जात आहे. शिवसेनेचे वर्चस्व असणारी महानगर पालिका आहे. असे जरी असले तरी दोघे भाऊ बेस्टमध्ये करिश्मा दाखऊ शकले नाहीत. त्यामुळे आगामी काळ कठिण आहे. भाजपाचे धोरण जनता आकर्षित करणारे आहे. वरचेवर त्यांची कामे जनतेला आवडणारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कामगिरी ही दमदार दिसून येते. अमेरिकेसारख्यासमोर घाबरत नाहीत, यापेक्षा मोठे धाडस काय असू शकते? जनतेला कामे दिसतात ते चांगले काम करण्याची तयारी असली पाहिजे. त्याच प्रमाणे आज जनतेला काय हवे आहे हे ओळखून काम केले पाहिजे. असे केले तरच सर्व पक्षाना यश मिळू शकेल. जनतेला विकास व जनतेविषयक कामे व्हवीत असे वाटते त्यामुळे पक्ष हा आलिकडे गौण दिसून येत आहे.

# पोळ्याच्या आठवणी



कृषिप्रधान भारतातील शेतकऱ्यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा सण म्हणजे पोळा.यांत्रिकीकरणाच्या आजच्या युगात बैलांची संख्या खूपच कमी झाली आहे भविष्यात बैलपोळा साजरा होणे बंद होईल अशी स्थिती निर्माण झाली आहे आमच्या लहानपणी पोळा सण प्रचंड उत्साहात साजरा केला जायचा अगदी नागपंचमी सणापासून आम्ही पोळा सणाची वाट पाहत असो तालुक्याच्या ठिकाणी शाळेत असूनही आई-वडील शेती करत असल्याने पोळ्या विषयी मनात एक वेगळीच ओढ असायची आठ ते दहा दिवस अगोदरच शहरातील बाजारपेठ बैलपोळयाच्या साहित्याने सजलेल्या असायच्या मग काही मग काय रस्त्याने जाता येता आपल्या बैलांसाठी काय काय घ्यायचे हे मनात ठरवलेले असायचे.

बैलपोळ्याच्या अगोदरच्या दिवशी गावाकडे जाण्याची परवानगी मिळाल्यावर चुलत भाऊ व माझ्याकडे कोणता बैल मी सजवणार ,हा बैल माझा तो बैल माझा यावरून शाब्दिक चकमक होऊन पुन्हा समझोत्याने बैलांची निवड व्हायची. आमच्याकडे चार बैल असायचे दुपारी गावाकडे पोहोचल्यावर बैल कोणत्या शेतात आहेत याचा अंदाज घेऊन त्या शेतात जायचो. शेत गावापासून दीड दोन किलोमीटर लांब असूनही प्रचंड उत्सुकतेमुळे आम्ही लगेच शेतात जायचो. शेतात गेल्यावर प्रवासातच निवड केलेल्या आपल्या बैलांचे कासरे हातात घेऊन मग आपला बेल कसा जास्त जगेल (जास्त चारा खाईल) याची काळजी घेतली जाई. शेतातून घरी येताना आपल्या बैलाचा कासरा आपल्याकडे असणे यात एक वेगळाच आनंद असायचा. संध्याकाळी पोळ्याच्या अगोदरच्या दिवशी खांदे मळणी असते यामध्ये सर्व बैलांची पूजा केली जाते. खांद्याला पळसमूळाच्या साह्याने तूप हळद लावली जाते. पूजा केल्यानंतर बैलांना चपाती चारली जाते. प्रतिनिधिक स्वरूपात एका बैलाला गोंडा बांधला जातो. दरवर्षीच्या निरीक्षणातून असे लक्षात आले की चार बैलापैकी कोणता तरी एक बैल चपाती खायचा नाही मग याचे कारण विचारल्यानंतर आजोबा सांगायचे की तो बैल रुसला असेल त्याच्या रुसण्याचे कारण काय असेल हे मात्र त्यावेळेस लक्षात यायचेच नाही पण आता वाटते कदाचित प्रातिनिधिक स्वरूपातला आपला मान आपल्याला मिळाला नाही असे तर त्याला सांगायचे नसेल.

रात्री खांदेमळणी झाल्यावर उद्याच्या पोळ्या विषयीची उत्सुकता असायची त्यामुळे लवकरच झोपायचो. म्हणजे सकाळी लवकर उठता येईल सकाळी लवकर उठून सर्वांसोबत बैल धुण्यासाठी नदीवर जायचो. आमचे खोंदला गाव मांजरा नदी काठावर असल्याने सर्व गावातील बैलांची नदीवर गर्दी असायची जिकडे नजर जाईल तिकडे बैलच दिसायचे. एखादा बैल पाण्यात जाण्यासाठी तयार नसायचा त्याला पाण्यात नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागायची. सर्वजण अगदी आपले बैल स्वच्छ दिसावेत यासाठी साबण,निरमा इत्यादीचा वापर करून बैल चांगले धुवायचे. पांढरे बैल स्वच्छ धुणे हे एक दिव्यच असायचे. कधी कधी बैल धुवून पाण्याच्या बाहेर काढले की पुन्हा शेणाने भरला की परत धुणे आलेच. बैल धुवून घरी आणल्यानंतर त्यांना कन्या (गहू भरडून शिजवलेल्या व त्यामध्ये गूळ घातलेला) चारल्या जायच्या. हे सर्व झाल्यावर मग बैलांना चारण्यासाठी शेतात नेले जायचे.

इकडे शेतात गोंडे बांधण्यासाठी बैलांच्या सजावटीचे साहित्य बनवण्याची लगबग सकाळपासूनच सुरू व्हायची. आजोबा, चुलते, वडील हे एका रूममध्ये सर्व बनवत असत. तोपर्यंत सर्व देवांसाठी नैवेद्य बनवण्याचे काम आजी व आई यांचे सुरू असायचे. मग काय सकाळी गावातील सर्व देवांना तेल घालणे, गोंडा बांधणे, नैवेद्य दाखविणे हे काम बच्चे कंपनीकडे असायचे. ते आनंदाने केले जायचे. पोळ्याला आमच्याकडे चाबूक बनवायची व वाजवण्याची प्रथा असायची. आंबाडीच्या वाकापासून ते बनवलेले असायचे. ते वाजविण्याचे कौशल्य ज्याच्याकडे आहे त्याच्या चाबकाचा मोठा आवाज यायचा. मला तो चाबूक वाजवताना एका पोळ्याला डोळ्यावर लागला होता दिवसभर डोळा उघडता येत नव्हता.

पोळ्याच्या दिवशी प्रत्येक शेतात शेतातील अवजारांना गोंडा बांधावा लागतो व शेतातील देवांना नारळ फोडावे लागतात. वर्षभरात सर्वात जास्त नारळ पोळ्याच्या दिवशी फोडले जातात. आमचे शेत वेगवेगळ्या ठिकाणी असल्यामुळे जवळपास हे सगळे करण्यासाठी दहा ते बारा किलोमीटर जावे लागायचे. मी माझ्या चुलत्यांसोबत दरवर्षी पोळ्याला गोंडे बांधण्यासाठी जायचो. प्रचंड पाय दुखायचे परंतु त्या मागील आनंदामुळे त्याचा त्रास वाटायचा नाही. बारा एक वाजेपर्यंत हे आटपायचे.

त्यानंतर बैलांची शिंगे रंगवणे ,बैलांच्या पाठीवर रंगविणे, बैलांची ढाल सजविणे यामध्ये दोन तीन तासाचा वेळ जायचा. बैल चांगले सजविणे यामध्ये स्पर्धा असायची. सर्वजण बैल सजविण्यासाठी कौशल्य पणाला लावायचे. ढालीला फुगे लावणे चमकी, बेगड चिटकविणे इत्यादी कामे केली जायची. आमच्याकडे चार बैल असायचे परंतु ढाल दोनच मग काय आपल्या दोन पैकी एकाला तरी ढाल लावायला भेटावे यासाठी घरच्यांकडे हट्ट केला जायचा. बैलांच्या गोठ्यात चुना व काऊच्या साह्याने रंगकाम म्हणजेच ठसे मारले जायचे. एका डालग्यात शेतीचे चाडेनळे, गाडगे, जु इत्यादींना रंगवले जायचे.


गावामध्ये सर्वप्रथम बैलांच्या पूजनाचा मान पाटलांकडे असायचा. पाटलांच्या बैल पूजेनंतर मग गावातील इतरांच्या बैलांचे पूजन केले जायचे. आमच्या वाड्यात आठ- नऊ बैल जोड्या असायच्या. गावातील सर्वांच्या बैलपुजनाचे ठिकाण ठरलेले असायचे. बैल पूजेसाठी म्हणजेच बैलाचे लग्न लावण्यासाठी ब्राह्मण (देवबप्पा बोलावले जायचे आमच्या गावासाठी एकच ब्राह्मण (देवबाप्पा) होते. मग काय ते त्या दिवशी व्हीआयपीच असायचे त्यांना प्रत्येक ठिकाणी बोलवायचे. बैलाचे लग्न मंगलाष्टक म्हणून लावले जायचे. त्यासाठी चाउर चाउर चांगभलं पाऊस आला चांगभलं म्हणत बैलांना प्रदक्षिणा घातली जायची. तो म्हणण्याचा मान आमच्या घरात होता. माझे चुलते ते म्हणायचे आम्ही त्यांच्या मागे पराती वाजवत म्हणायचो. खूप मजा यायची अगदी परातीला खोलगे पडेपर्यंत आम्ही वाजवायचो.

बैल पूजा झाल्यानंतर बैलांची गावातून मिरवणूक काढली जायची. म्हसोबा - मारुतीच्या मंदिराला प्रदर्शना घालावी लागे. पूर्ण रस्त्याने बैलांची सजावट पाहण्यासाठी तोबा गर्दी असायची. लहानपणी आम्ही मिरवणुकीत बैलावर देखील बसायचो. बैलावर बसल्यावरचे फिलिंग शब्दात व्यक्त करणे अश्यकच.मिरवणुकीनंतर आमच्या वाड्यात प्रत्येकाच्या घरासमोर बैलांना ओवाळले जायचे व त्यांना पोळी चारली जायची. एक एका बैलाच्या वाट्याला आठ ते दहा पोळ्या यायच्या. मग काय बैलाची मजाच असायची. बैल पूजेनंतर गावातील म्हसोबा, मारुतींना नारळ फोडले जायचे व ते सर्वांना वाटले जायचे. लहान मुले अगदी नारळाची करवंटी घेऊन त्यामध्ये नारळ गोळा करायचे. गावातील प्रत्येक माणूस कदाचित पूर्ण वर्षभर खात नसेल एवढे नारळ पोळ्याच्या दिवशी खायचा. नारळ वाटून झाल्यानंतर पोळ्याचा उपवास सोडला जाई. तो सोडल्यानंतर पोळ्याची सांगता होत असे. व यानंतर आम्हाला पुन्हा पुढच्या वर्षीच्या पोळ्याचे वेध लागायचे. या वर्षी राहून गेलेल्या गोष्टी पुढच्या वर्षी नक्की करूयात या आशावादास पुढच्या पोळ्याची उत्सुकता असायची.

**शब्दांकन**
**श्री. सचिन नानासाहेब लांडगे**
**( खोंदला ता.कळंब जि.धाराशिव)**
**संकलन - विलास मुळीक**

# पोळा: बळीराजाचा कृतज्ञता सोहळा...

## मातीशी जुळलेले नाते आणि मुक्या सोबत्याचा गौरव







बळीराजाचा सोबती मुक्या श्रमाचा धनी,
अथक कामातून तो पूर्ण विश्रांती घेई.
सजवूनी थाटला त्याचा गौरव मनी,
पोळा हा सण, कृतज्ञतेची साक्ष देई.

भारतीय कृषी संस्कृतीमध्ये शेतकरी आणि बैल यांच्यातील नाते केवळ कामापुरते मर्यादित नसून, त्यात एक अनोखा भावनिक बंध आहे. शेतातील मातीला सोन्याचे रूप देणाऱ्या या मुक्या सोबत्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा सोहळा म्हणजे पोळा. हा सण केवळ बैलांची पूजा करण्याचा दिवस नसून, वर्षभर खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या त्यांच्या साथीदाराला मान देण्याचा, त्याच्या श्रमाचा सन्मान करण्याचा क्षण आहे. ग्रामीण जीवनातील हा उत्सव आपल्याला मातीशी आणि निसर्गाशी असलेल्या आपल्या अतूट नात्याची पुन्हा एकदा आठवण करून देतो. मराठी माणसांच्या जीवनात पोळा सणाला महत्त्व असून मराठवाडा आणि विदर्भात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.



भारतीय कृषी संस्कृतीचा आत्मा म्हणजे शेतकरी आणि त्याचा जीवश्च-कंठश्च मित्र, बैल. हे नाते केवळ कामापुरते मर्यादित नसून, ते श्रमाचे, विश्वासाचे आणि निस्वार्थ प्रेमाचे प्रतीक आहे. याच अढळ नात्याचा उत्सव म्हणजे पोळा. श्रावण किंवा भाद्रपद महिन्याच्या अखेरीस, पावसाच्या सरींनी धरती तृप्त झाल्यावर, हा सोहळा महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा होतो. हा सण म्हणजे बळीराजाने आपल्या वर्षभराच्या सहकाऱ्याप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता आहे.

शेतीप्रधान जीवनात आज यांत्रिकीकरणाच्या काळात ही बैलांशिवाय शेतीची कल्पना करणेच शक्य नाही. नांगरणीच्या पहिल्या टप्प्यापासून ते पेरणी आणि काढणीपर्यंत, शेतातील प्रत्येक काम बैलांच्या खांद्यावरच अवलंबून असते. त्यांच्या अथक श्रमामुळेच शेतकरी त्याच्या शेतात सोन्यासारखे पीक पिकवू शकतो. म्हणूनच, पोळ्याच्या दिवशी त्यांच्या श्रमाचा सन्मान केला जातो. या दिवशी त्यांना शेतीच्या कामातून पूर्ण विश्रांती मिळते. हा दिवस त्यांच्यासाठी राजासारखा असतो, जिथे फक्त मान आणि प्रेम असते.

पोळ्याच्या उत्सवाची तयारी आदल्या दिवसापासूनच सुरू होते. बैलांना स्वच्छ पाण्याने अंघोळ घातली जाते आणि त्यांचे खांदे हळद-तुपाने शेकले जातात, जेणेकरून वर्षभराच्या कामाचा थकवा दूर होईल. त्यानंतर त्यांना सजवण्यासाठी शेतकरी मनसोक्त मेहनत घेतो. त्यांच्या शिंगांना रंग लावला जातो, त्यावर चमकीदार बेगड चढवली जाते. गळ्यात कवड्या आणि घुंगरांच्या माळा, पाठीवर सुंदर नक्षीची झूल आणि पायात नवीन तोडे घातले जातात. हा सारा थाटमाट पाहताना बैलही आनंदी झाल्याचे जाणवते.

सजवलेल्या बैलांना घरासमोर आणून त्यांची मनोभावे पूजा केली जाते, आरती केली जाते आणि त्यांना पुरणपोळी, लाडू, भाकरी यांसारख्या गोड पदार्थांचा नैवेद्य दिला जातो. ज्यांच्याकडे बैल नाहीत, ते मातीच्या लहान बैलांची पूजा करून या सोहळ्यात सहभागी होतात. पोळा हा सण केवळ बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा नाही, तर तो ग्रामीण समाजाला एकत्र आणणारा आणि त्यांच्यातील एकोपा वाढवणाराही आहे.

पोळा हा सण केवळ एक धार्मिक विधी नाही, तर तो शेतकरी आणि त्याच्या मुक्या सोबत्याच्या निस्वार्थ नात्याचा एक मोठा सोहळा आहे. तो आपल्याला आठवण करून देतो की माणूस आणि निसर्ग यांच्यात एक खोलवरचा भावनिक बंध आहे. हा सण आपल्याला शिकवतो की प्रत्येक श्रमाचा सन्मान केला पाहिजे आणि आपल्यासोबत असलेल्या प्रत्येक घटकाप्रती कृतज्ञता बाळगली पाहिजे. आपण पोळा हा सण साजरा करत असताना बैलच नाही तर सर्व प्राणीमात्राशी कृतज्ञता बाळगू या पोळा सणाच्या निमित्ताने सर्व शेतकरी बांधवांना मनःपूर्वक शुभेच्छा.

**-राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
मो. ९८९०५७७१२८

# बैलपोळा- पशुधनांप्रती आभार व्यक्त करण्याचा दिवस!

शेतकरी वर्गासाठी खूप महत्त्वाचा समजला जाणारा सण म्हणजेच बैलपोळा ! बैलपोळा हा भारतीय संस्कृतीतील अनेक सणांपैकी एक महत्त्वाचा सण आहे. शेतकरी हा सण साजरा करून आपल्या नांगराला जोडलेल्या बैलांचे आभार मानतात, कारण हे बैल त्यांच्या जमिनीची नांगरणी व पेरणी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.



**हिंदू धर्मातील बैल आणि गायीचे महत्त्व:-**

हिंदू धर्मामध्ये गायीला पवित्र मानले जाते आणि तिची पूजा केली जाते. बैलपोळा हा सण महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, आणि तेलंगणा या राज्यांमध्ये साजरा केला जातो. काही ठिकाणी याला पोळाअमावस्या असेही म्हणतात.

महाराष्ट्रातील शेतकरी बैलपोळा साजरा करून आपल्या जनावरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात.

**श्रावण अमावास्येचा विशेष दिवस:-**

श्रावण महिन्यातील अमावास्येला शेतकरी आपल्या गायी व बैलांची पूजा करतात. बैलांना अंघोळ घालून स्वच्छ केले जाते, आणि त्यांना चमकदार फिती, घंटा, फुले, आणि शाल यासारख्या सजावटीने सजवले जाते. या दिवशी ढोल, ताशे, आणि इतर वाद्यांच्या साथीने बैलांची शोभायात्रा काढली जाते.

**बैलपोळ्याच्या परंपरा आणि सणाच्या प्रथा**

बैलांना तेल लावून मसाज केला जातो आणि नंतर त्यांना शाल, फुले, घंटा, आणि इतर सजावटींनी सजवले जाते. बैलांसाठी विशेष पूजा केली जाते. गाई व बैलांची आरती करण्यासाठी तुपाचे दिवे लावले जातात.बैलांना दिवसभर विश्रांती दिली जाते आणि त्यांचे कौतुक केले जाते.

लोक घरांना तोरण व रांगोळीने सजवतात, पूजा थाळ्या तयार करतात, आणि सणासाठी पुरणपोळी व इतर महाराष्ट्रीय खाद्यपदार्थ बनवले जातात.

लहान मुले लाकडाच्या किंवा मातीच्या बैलांच्या प्रतिकृती तयार करतात.

बैलपोळा हा शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे महत्त्व अधोरेखित करणारा सण आहे. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो, आणि यामध्ये बैलांप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते.

**-वंदना वेदपाठक**

# कच्चे, उकडलेले की ऑम्लेट? अंडे कसे खाणे ठरते फायदेशीर...घ्या जाणून

मुंबई: अंडी हा प्रोटीनचा एक उत्तम स्रोत आहे. अनेक लोक त्यांच्या आहारात नियमितपणे अंड्यांचा समावेश करतात. परंतु, अंडी वेगवेगळ्या प्रकारे शिजवली जातात. अंडी कच्ची, उकडलेली अथवा ऑम्लेटच्या रूपात खाल्ली जातात. पण यापैकी कोणत्या पद्धतीने शिजवलेल्या अंड्यातून सर्वाधिक प्रोटीन्स मिळतात, असा प्रश्न अनेकांना पडतो.



समोर आलेल्या माहितीनुसार, अंडी वेगवेगळ्या पद्धतीने शिजवल्याने त्यातील प्रोटीनचे प्रमाण कमी-जास्त होत नाही. शिजवण्याच्या कोणत्याही पद्धतीमुळे अंड्यातील पोषक तत्त्वांवर परिणाम होत नाही. तुम्ही अंडी कोणत्याही पद्धतीने खा, त्यातून तुम्हाला समान प्रमाणात प्रोटीन्स मिळतील. मात्र, अंड्यांच्या पिवळ्या बलकामध्ये कोलेस्ट्रॉल असते. त्यामुळे, ज्यांना कोलेस्ट्रॉलची समस्या आहे, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अंड्यांचे सेवन करावे. तसेच, अंड्यांसोबत इतर खाद्यपदार्थांचा वापर केल्यास एकूण कॅलरी वाढू शकतात. उदाहरणार्थ, जर तुम्ही अंडी तेलात तळली, तर तेलामुळे कॅलरी वाढतील.

थोडक्यात, तुम्ही अंडी कोणत्याही प्रकारे खा, त्यातील प्रोटीन तुम्हाला समान प्रमाणात मिळेल. फक्त, तेलाचा वापर टाळल्यास कॅलरी वाढणार नाहीत आणि अंडी अधिक पौष्टिक राहतील.

# मुलांची वाढ योग्य प्रकारे व्हावी यासाठी

मुंबई: मुलांची वाढ योग्य प्रकारे व्हावी यासाठी त्यांना पौष्टिक आहार देणे खूप महत्त्वाचे असते. चांगल्या उंचीसाठी आणि मजबूत हाडांसाठी काही विशिष्ट पदार्थांचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते. येथे काही शाकाहारी पदार्थांची माहिती दिली आहे, जे मुलांची उंची वाढवण्यासाठी आणि त्यांच्या हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी मदत करतात.

उंची वाढवणारे आणि हाडे मजबूत करणारे पदार्थ:

सोयाबीन: सोयाबीनमध्ये प्रोटीनचे प्रमाण जास्त असते, जे हाडांच्या आणि स्नायूंच्या विकासासाठी आवश्यक आहे. मुलांच्या आहारात सोयाबीनचा समावेश केल्यास त्यांची उंची वाढण्यास मदत होऊ शकते.

पालक: पालकमध्ये कॅल्शियम, लोह आणि व्हिटॅमिन के भरपूर प्रमाणात असते, जे हाडांच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. नियमितपणे पालक खाल्ल्याने हाडे मजबूत होतात.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थ: दुध, दही, पनीर यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांमध्ये कॅल्शियम आणि प्रोटीन मोठ्या प्रमाणात आढळतात. ही दोन्ही पोषणतत्वे हाडांच्या मजबुतीसाठी आणि वाढीसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

बीन्स: बीन्समध्ये प्रोटीन, व्हिटॅमिन बी, लोह आणि फायबर असते. हे सर्व घटक मुलांच्या शारीरिक वाढीसाठी महत्त्वाचे आहेत.

केळी: केळीमध्ये पोटॅशियम, मॅंगनीज आणि कॅल्शियम असते, जे हाडांची घनता वाढवण्यासाठी मदत करतात. नियमित केळी खाल्ल्याने हाडे मजबूत होतात.

बदाम: बदामामध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम आणि प्रोटीन भरपूर प्रमाणात असते. हे सर्व घटक हाडांच्या विकासासाठी महत्त्वाचे आहेत.

गाजर: गाजरमध्ये व्हिटॅमिन ए असते, जे शरीराच्या योग्य वाढीसाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे.

या पदार्थांचा मुलांच्या आहारात समावेश केल्यास त्यांची शारीरिक वाढ चांगली होऊ शकते. मात्र, कोणताही आहार सुरू करण्यापूर्वी एकदा डॉक्टरांचा सल्ला घेणे नेहमीच योग्य ठरते. योग्य पोषण, नियमित व्यायाम आणि पुरेशी झोप या तिन्ही गोष्टी मुलांच्या संपूर्ण विकासासाठी आवश्यक आहेत.



# आपत्ती- नैसर्गिक आणि मानवनिर्मित

ठाणे शहरात घोडबंदर रस्ता तब्बल सहा तास पाण्याखाली होता! कोकणात मुसळधार वृष्टी सुरु आहे. विदर्भात पावसाने थैमान घातले. मराठवाड्यातही अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

पावसाने महाराष्ट्रात हाहाकार माजवला. राजधानी मुंबईत तर नागरिकांच्या हालास पारावार उरला नाही. अंदाजापेक्षा अधिक पाऊस झाला, म्हणून नियोजन कोलमडले, या सारखे युक्तीवाद आता होतील आणि नेहमीप्रमाणे राजकीय पक्ष, राजकीय पुढार्यांकडून एकमेकांना आरोपीच्या पिंजर्यात उभे केले जाईल. विशेषतः मुंबईत! नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याची क्षमता सोडूनच द्या, आपली शहरे जोरदार पावसाचाही मुकाबला करु शकत नाहीत. महानगरांमधील जनजीवन बंद पडते. मुंबईचा विषय तर सुधारण्याच्या पलीकडे गेला आहे. लोकल सेवा ही मुंबई आणि उपनगरांची जीवनवाहिनी. ती पावसाच्या तडाख्याने बंद पडली. रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले. विमानतळावर पाणी साचले. मुंबईबरोबरच ठाण्यात शाळांना सुट्टी जाहीर करावी लागली, शासकीय कार्यालये बंद ठेवण्याची वेळ आली. सार्वजनिक वाहतुकीसाठी वापरल्या जाणार्या बस पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे एका जागी स्थिर राहू शकत नव्हत्या. चर्चगेट ते विरार, या संपूर्ण पट्ट्यात वाहतूक बंद होती. विदर्भात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस सुरु आहे. पावसाची संततधार मुंबई, ठाण्यासाठी परीक्षा घेणारी ठरत आहे. या परीक्षेतून मुंबई महानगर केव्हाच बाद झाले. आता ठाण्याच्या बाबतीत ती पुनरावृत्ती होईल. नव्या मुंबईचे प्रश्न आहेत आणि आता तिसरी मुंबई उभी राहणार आहे. विकासाच्या नावाने सुरु असलेला हा विस्तार नागरिकांच्या जीवाशी खेळणारा ठरेल. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने दैनंदिन कामकाजात कोणत्याही कारणाने निर्माण होणारा अडथळा कोट्यवधीचे नुकसान करणारा ठरतो. अरबी समुद्राच्या जलपृष्ठाचे तपमान जागतिक तपमान वाढीमुळे वाढत चालले आहे. यातून बाष्पीभवनाचा वेग वाढतो आणि प्रमाणापेक्षा जास्त बाष्प वाहून नेणार्या ढगांची निर्मिती होती. किनारपट्टीची सापेक्ष आर्द्रता पावसासाठी अनुकूल असल्याने हे ढग अतिवृष्टीला कारण ठरतात.







नियोजनाचा बोजवारा

तपमान वाढीचा घटक बाजूला ठेवला तरी पाण्याचा निचरा व्यवस्थित व्हावा, यासाठीचे नियोजन शासकीय यंत्रणांच्या हाती आहे. प्रत्येक वर्षी नाले, गटारांची सफाई झाल्याचे ढोल वाजतात आणि प्रत्यक्षात चार-दोन वेळा मुसळधार पाऊस झाल्यावर यंत्रणांचे भांडे फुटते. नागरिकांबद्दल यंत्रणांकडे संवेदनशीलता उरलेली नाही, हे सातत्याने दिसते; मात्र त्यावर आवाज उठवावा, पाठपुरावा करून यंत्रणांना त्यांचे कर्तव्य करण्यास भाग पाडावे, ही इच्छाशक्ती लोकप्रतिनिधींकडे दिसत नाही. जेथे टक्केवारी महत्त्वाची ठरते, तेथे नियोजनाचा बोजवारा उडणार, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. टक्केवारीच्या साखळीतून फोलावलेला भ्रष्टाचार आणि सडक्या यंत्रणा हे खरे दुखणे आहे; पाऊस नव्हे! याच महिन्यात अंमलबजावणी संचालनालयाने वसई-विरारच्या माजी आयुक्तांना बेकायदा बांधकाम परवानग्या, भ्रष्टाचार या आरोपांखाली अटक केली. त्यांच्या घरी कोट्यवधींचे घबाड सापडले. महानगरे बकाल करणारे हे घटक जोपर्यंत कायम आहेत तोपर्यंत सामान्यांवर टांगती तलवार कायम राहणार आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे रुंदीकरण 'अर्थपूर्ण' कारणांमुळेच वर्षानुवर्षे रेंगाळले. ताम्हिणी घाटातून कोकणात जाणार्या हजारो वाहनचालकांना कायम याचा फटका बसतो. आताच्या पावसात तर घाटाखाली चार-सहा किलोमीटरच्या रांगा दोन्ही बाजूने लागल्या होत्या. पुण्यासारख्या शहरात कायम वाहतूक कोंडीचा फटका बसतो, पावसाचा जोर असताना तो असह्य असतो; पण शहरातील वाहतूक कोंडी कायमसाठी दूर व्हावी, यासाठी किती गांभीर्याने प्रयत्न होतो? नदीकाठी लाल आणि निळ्या रेषेचे नियम धुडकावून पुण्यात बांधकामे झाली आहेत. मध्यभागी उंच आणि दोन्ही बाजूने उतार हीच रस्ते बांधणीची शास्त्रीय पद्धत आहे. पुण्यासारखे महानगर त्यापासून अनेक मैल दूर आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांबद्दल जास्त बभ्रा झाला, तर निकृष्ट दर्जाचे डांबर टाकून मोकळे व्हायचे, ही येथे प्रथा. आता तर त्यापलीकडे मजल मारून भर पावसात डांबरीकरण केले जात आहे. त्यामुळे सर्व दोष पावसाचा नाही, हे लक्षात घेतले पाहिजे!

## डॉक्टर टीप्स

### बुद्धी तल्लख होण्यासाठी आपल्या आहारात करा हे पदार्थ समाविष्ट



ज्स्ट्रॉबेरी, करवंदे, रास्पबेरी या सारख्या फळांमध्ये फायटोकेमिकल्स मुबलक मात्रेमध्ये असतात. ही बुद्धीवर्धक असून, स्मरणशक्ती तल्लख ठेवणारी आहेत. ब्रोकोलीमध्ये असणारे सल्फोराफेन हे तत्व मेंदूची शिथिलता दूर करण्यास सहायक आहे. यामध्ये असलेले फोलिक ॲसिड मेंदू सक्रीय राहण्यास मदत करणारे असून, त्यामुळे अल्झायमर्स सारख्या व्याधींचा धोका पुष्कळ अंशी कमी होतो.भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक मुबलक मात्रेमध्ये असून, हा क्षार बुद्धीवर्धक आणि स्मरणशक्ती तल्लख करणारा आहे. त्याशिवाय यामध्ये असणारे मॅग्नेशियम, ब जीवनसत्वे, ही देखील मेंदूच्या आरोग्यास पूरक आहेत.बीटामध्ये मुबलक प्रमाणात असलेल्या नायट्रेटस मुळे मेंदूला होणारा रक्तप्रवाह चांगला राहतो. त्यामुळे बीटाचे सेवनही बुद्धीवर्धक मानले गेले आहे. **(क्रमशः)**

## विनोद





**अमित : आई आई, आज आम्हाला लिहायला शिकवले.**
**आई : काय लिहिलेस?**
**अमित : अजून आम्हाला वाचायला नाही शिकवले.**

## संदेश

Santa apne bete ko: is baar agar exam mein fail huaa, to mujhe pitaji mat bulaana.
kuch din ke baad,
Santa: result ka kya hua?
Santa ka beta: sorry santa

## सुविचार

शिहाणे लोक कोणावरही विश्वास ठेवत नाहीत.
–टॅसिटस




संस्कृत सुभाषित

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफल हेतूर्भूमातेसंगोस्त्व कर्मणि ॥**
**(भगवद्गीता)**

**अर्थ** – तू फक्त कर्माचा अधिकारी आहेस, कर्म करणे हेच तुझ्या हाती आहे. त्या कर्मातून फळाची अपेक्षा धरू नको. फळ मिळो वा न मिळो, तुला कर्म केलेच पाहिजे आणि फळ मिळत नाही म्हणून कर्मच न करण्याची इच्छा तू बाळगू नको. तू कर्म करीतच रहा.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी
२०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा
२५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

**उभे शब्द**

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग
३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ
४६. वार्धक्य
४८. भेग
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्नी
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

**आडवे उत्तर**

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळ-वाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

**उभे उत्तर**

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हतारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ



# क्रीडा विश्व



इंडोनेशियातील सुराबाया येथे महिला अंडर-२१ वर्ल्ड चॅम्पियनशिप फिबा व्हॉलीबॉल सामन्यात गोल केल्यानंतर आनंद साजरा करताना अर्जेंटिनाच्या महिला खेळाडूं.

# आशिया चषकात खेळण्यास परवानगी

## द्विदेशीय मालिकांसाठी मात्र नकार; क्रीडा मंत्रालयाकडून भूमिका स्पष्ट

नवी दिल्ली : आगामी आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लढतीचा मार्ग मोकळा झाला आहे. क्रीडा मंत्रालयाने आपली भूमिका स्पष्ट करताना बहुदेशीय स्पर्धेत भारतीय संघाला पाकिस्तानविरुद्ध खेळण्यापासून रोखले जाणार नाही असे म्हटले आहे. मात्र, त्याच वेळी या दोन पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांत भारत किंवा पाकिस्तानच काय, तर त्रयस्थ ठिकाणीही द्विदेशीय मालिका होणार नसल्याची भूमिका क्रीडा मंत्रायलाने घेतली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लढतीबाबत संभ्रम निर्माण झाला होता. नुकत्याच इंग्लंडमध्ये झालेल्या माजी खेळाडूंच्या स्पर्धेत (वर्ल्ड चॅम्पियनशीप ऑफ लिंजड्स) भारताने पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार दिला होता. भारतीय खेळाडूंनी उपांत्य फेरीच्या लढतीवरही पाणी सोडले होते. पुढील महिन्यात संयुक्त अरब अमिराती येथे होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तान या संघांना एकाच गटात स्थान देण्यात आल्यानंतर त्यांच्यातील लढतीबाबत काय निर्णय घेतला जाणार, याकडे सर्वांचे लक्ष होते.

पाकिस्तानविरुद्ध खेळायचे की नाही, याबाबतचा निर्णय सरकारकडून घेतला जातो. आम्ही केवळ त्यांच्या आदेशाचे पालन करतो, अशी भूमिका भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) घेतली जाते. आता क्रीडा मंत्रालयाने आशिया चषकात पाकिस्तानविरुद्ध खेळण्याची परवानगी दिल्याने उभय संघांत ठरल्याप्रमाणे १४ सप्टेंबरला साखळी लढत होण्याची शक्यता आहे. त्यानंतर बाद फेरी आणि अंतिम फेरीतही ते आमनेसामने येऊ शकतील.

मंत्रालयाने पाकिस्तानवर भर देऊन भारताच्या आंतरराष्ट्रीय सहभागासंदर्भात नवे धोरण जाहीर केले. मंत्रालयातील सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, भारतीय खेळाडूंना पाकिस्तानात जाण्यास बंदी घालणारे आणि शेजारील देशाच्या खेळाडूंना द्विपक्षीय सामन्यांसाठी भारतात येण्यास मनाई करणारे हे धोरण तात्काळ लागू झाले आहे. 'भारतीय संघ पाकिस्तानमधील द्विदेशीय स्पर्धांमध्ये भाग घेणार नाहीत. तसेच आम्ही पाकिस्तानी संघांना द्विदेशीय स्पर्धांसाठी भारतात खेळण्याची परवानगी देणार नाही,' असे मंत्रालयाच्या नव्या धोरणात नमूद करण्यात आले आहे.

''भारत आणि पाकिस्तान द्विदेशीय मालिका अमेरिकेत नियोजित असली तरी त्यातही संघाला खेळू दिले जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत द्विदेशीय स्पर्धा होणार नाहीत,'' असे मंत्रालयातील सूत्राने सांगितले.असे असले तरी, बहुदेशीय स्पर्धांत या दोन देशांच्या संघांतील लढत शक्य आहे. ''आशिया चषक ही बहुदेशीय स्पर्धा आहे. त्यामुळे त्यात भारतीय संघाला पाकिस्तानविरुद्ध खेळण्यापासून आम्ही रोखणार नाही. बहुदेशीय स्पर्धांबाबत आमची भूमिका स्पष्ट आहे.

आम्ही कोणताही अडथळा आणणार नाही. स्पर्धा पाकिस्तानात होणार असेल, तर मात्र त्या वेळची परिस्थिती पाहून निर्णय घेतला जाईल,'' असे सूत्राकडून सांगण्यात आले. क्रीडा मंत्रालयाच्या नव्या धोरणामुळे आता पाकिस्तानच्या संघांना भारतात होणाऱ्या स्पर्धांमध्ये प्रवेश मिळू शकणार आहे. भारताने २०३० ची राष्ट्रकुल स्पर्धा, तर २०३६ ची ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित करण्याचे स्वप्न बाळगले आहे. या दोन्ही स्पर्धांचे यजमानपद भूषविताना ऑलिम्पिक चळवळीला साजेशी सर्वसमावेशक भूमिका घेण्यास भारत वचनबद्ध असल्याचे धोरणात नमूद करण्यात आले आहे. याच कारणास्तव, महिनाअखेरीस बिहार येथे सुरू होणाऱ्या आशिया चषक हॉकी स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या खेळाडूंना व्हिसा मंजूर करण्यात आला होता. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तानने स्पर्धेतून माघार घेतली. ''भारतीय संघ आणि खेळाडू, पाकिस्तानचा सहभाग असलेल्या बहुदेशीय आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळू शकतील. त्याचप्रमाणे, पाकिस्तानी खेळाडू आणि संघ भारताने आयोजित केलेल्या बहुदेशीय स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकतील,'' असे धोरणात म्हटले आहे.




**पुढील महिन्यात संयुक्त अरब अमिराती येथे होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तान या संघांना एकाच गटात स्थान देण्यात आल्यानंतर त्यांच्यातील लढतीबाबत काय निर्णय घेतला जाणार, याकडे सर्वांचे लक्ष होते.**

**'बीसीसीआय'च्या निवडणुका नव्या विधेयकानुसार?**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) पुढील महिन्यात होणाऱ्या निवडणुका नव्या क्रीडा विधेयकानुसार झाल्या तर आवडेलच. मात्र, नवीन कायद्याचे नियम त्या वेळेपर्यंत अधिसूचित झाले नाहीत, तर सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या लोढा समितीच्या शिफारशींनुसार, 'बीसीसीआय'च्या निवडणुका होऊ शकतील, असे क्रीडा मंत्रालयाच्या सूत्राकडून सांगण्यात आले.

लोढा समितीच्या शिफारशींनुसार, पदाधिकाऱ्याचे वय ७० वर्षांपेक्षा अधिक असू शकत नाही. मात्र, नव्या क्रीडा धोरणानुसार ७०-७५ वयोगटातील व्यक्तींना निवडणूक लढवण्याची परवानगी आहे. 'आयसीसी'च्या पदाधिकाऱ्यांसाठीच्या तरतुदींमध्ये वयाची कोणतीही मर्यादा नाही. 'बीसीसीआय'चे अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी काही दिवसांपूर्वीच वयाची सत्तरी गाठली. मात्र, 'बीसीसीआय'ने अंतरिम अध्यक्षाची निवड केलेली नाही.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### रोहित शर्माच्या मैदानावरील पुनरागमनाची तारीख ठरली, 'या' सीरिजमध्ये खेळणार

दिल्ली-रोहित शर्मा हा टेस्ट आणि टी २० क्रिकेटमधून निवृत्त झाल्यावर त्याच्यावर वनडे क्रिकेटमधून सुद्धा निवृत्त होण्यासाठी दबाव आणला जात आहे असे रिपोर्ट्स काही दिवसांपासून समोर येत होते. मात्र आता रोहित शर्माच्या फॅन्ससाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. यामध्ये एका मीडिया रिपोर्ट्सनुसार रोहित शर्मा हा भारत ए आणि ऑस्ट्रेलिया ए यांच्यात सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या तीन वनडे सामन्यांमध्ये खेळण्याच्या तयारीत आहेत. ही सीरिज त्याच्याकरता फॉर्ममध्ये परतण्यासाठी एक चांगली संधी आहे.

कधी असणार सामना?

टीम इंडिया ऑक्टोबर महिन्यात ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. तेथे ते १९ ऑक्टोबर पासून वनडे सीरिज खेळतील. त्यानंतर दोन्ही संघात ५ सामन्यांची टी २० सीरिज सुद्धा होणार आहे. वनडे सीरीजसाठी टीम इंडियामध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहलीला सुद्धा सामील करण्यात येणार आहे. ठर्शीर्डोी च्या माहितीनुसार १९ ऑक्टोबर पूर्वी सुरु होणाऱ्या या सीरिजपूर्वी भारत ए विरुद्ध ऑस्ट्रेलिया ए यांच्यात ३० सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान अनऑफिशियल वनडे सीरीज होणार आहे. ही सीरिज खेळण्यासाठी रोहित शर्माने इच्छा दर्शवली आहे.

विजय हजारे ट्रॉफीमध्ये सुद्धा खेळण्याची शक्यता :

रिपोर्ट्सनुसार रोहित शर्मा ऑस्ट्रेलिया ए विरुद्ध तीन सामने खेळू इच्छितो. ज्यासाठी त्याने सराव सुद्धा सुरु केलाय. या दरम्यान अशी बातमी समोर आलीये की ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर होणारी वनडे सीरिज ही रोहित शर्माची शेवटची वनडे सीरिज ठरू शकते. रिपोर्ट्सनुसार रोहितला वनडे संघात स्थान मिळवण्याच्या शर्यतीत ठेवण्यासाठी, बीसीसीआय त्याला डिसेंबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळण्यास सांगू शकते.

***

### अजिंक्य रहाणेने आशिया चषकासाठी प्लेईंग ११ निवडली, जितेश शर्माला वरचं स्थान, चकीत करणारी टीम!

मुंबई-आशिया चषक स्पर्धेचा थरार रंगण्यास आता काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. येत्या ९ सप्टेंबरपासून यूएईमध्ये आशिया चषक टी ट्वेण्टी स्पर्धेला सुरुवात होत आहे. या स्पर्धेसाठी भारताच्या १५ जणांच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वात टीम इंडिया मैदानात उतरणार आहे. भारताचा पहिला सामना १० तारखेला यूएईविरुद्ध खेळवला जाणार आहे. तर दुसरा सामना १४ सप्टेंबरला पाकिस्तानविरुद्ध दुबईत होणार आहे. एकीकडे भारतीय संघाची घोषणा झाली असताना आता प्लेईंग इलेव्हन अर्थात अंतिम ११ जण कोण मैदानात उतरणार याची उत्सुकता आहे. भारताच्या दिग्गज खेळाडूंनी आपआपले ११ खेळाडू अर्थात प्लेईंग ११ निवडले आहेत. आता टीम इंडियाचा धडाकेबाज खेळाडू अजिंक्य रहाणेने आशिया चषकासाठी आपल्या पसंतीची प्लेईंग ११ निवडली आहे.

महत्वाचं म्हणजे अजिंक्य रहाणेने प्लेईंग ११ निवडताना संजू सॅमसनला संधी मिळण्याची शक्यता नसल्याचं म्हटलं आहे. कारण शुभमन गिल टीम इंडियात परतल्यामुळे गिल आणि अभिषेक शर्मा सलामीला उतरतील, त्यामुळे संजू सॅमसनचा फलंदाजी क्रम हा सर्वात मोठा प्रश्न निर्माण होईल. त्यावेळी जितेश शर्माला विकेटकीपर फलंदाज म्हणून संघात स्थान मिळू शकतं, असं अजिंक्य रहाणे म्हणाला. ''मला खात्री आहे की शुभमन गिल हा अभिषेक शर्मासोबत सलामीला उतण्याची शक्यता जास्त आहे. पण मला वैयक्तिकरित्या संजू सॅमसनला संघात पहायला आवडेल. कारण त्याने यापूर्वी खरोखरच चांगली कामगिरी केली आहे

# क्रिकेटर विनोद कांबळीची अचानक तब्येत खालावली



दिल्ली-मागच्या काही दिवसांपासून विनोद कांबळी यांना तब्येतीच्या कुरबुरी सुरू होत्या. मात्र अचानक तब्येत खालवल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना बोलताही येत नसल्याची माहिती समोर आली आहे. विनोद कांबळी यांच्या भावाने अपडेट दिली.

टीम इंडियासाठी १०४ वनडे आणि १७ कसोटी सामने खेळून भारताचे प्रतिनिधित्व करणारे माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी सध्या गंभीर आजाराशी लढत आहेत. याबाबतची माहिती त्यांचे भाऊ वीरेंद्र कांबळी यांनी शेअर केली. त्याने माझा दादा लवकर बरा व्हावा यासाठी प्रार्थना करा असे आवाहन करावे असे चाहत्यांना या पोस्टमधून आवाहन केले आहे.

सचिन तेंडुलकरसोबत एकेकाळी त्याच्या जबरदस्त स्ट्रोक खेळासाठी ओळखले जाणारे माजी फलंदाज विनोद कांबळी गेल्या डिसेंबरमध्ये मूत्रमार्गाच्या संसर्गामुळे हालचाल करणं, बोलण्यात अडचणीत आहेत. मागच्या काही दिवसांपासून त्यांची तब्येत बरी नव्हती, मात्र आता प्रकृती खालावल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्या भावाने सांगितलं की दादा काही चुकीच्या सवयींमध्ये काही काळ अडकला होता. त्याचा परिणाम त्याच्या करियरवर देखील झाला. दादा आजारातून पूर्णपणे बरा होऊ शकला नाही. गेल्यावर्षी ऑक्टोबरमध्ये त्यांची तब्येत बिघडल्याची माहिती समोर आली होती. त्यावेळी युरिन इन्फेक्शन होते. हे इन्फेक्शन ठिक झाल्यानंतर त्यांना हॉस्पिटलमधून घरी सोडण्यात आले. दादाला बोलताना त्रास होतो असेही त्याच्या भावाने सांगितले. वांद्यातील राहत्या घरी त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. चालण्या फिरण्यात अडचणी येत असल्याचेही वीरु कांबळी याने सांगितलं. त्याने याची माहिती एका मुलाखतीदरम्यान दिली. त्याने चाहत्यांना दादा लवकर बरा व्हावा यासाठी प्रार्थना करा असे म्हटले आहे.



चीनमधील जिओझोऊ शहरातील वेंक्सियान काउंटीतील चेन्जियागौ गावात ताई ची तलवारबाजीचा सराव करताना लाटवियन विद्यार्थी.

# भारत-पाकिस्तान सामन्यांबाबत भारत सरकारची कठोर पाऊले



**नवी दिल्ली:** भारत सरकारने भारत-पाकिस्तान क्रीडा सामन्यांबाबत कठोर भूमिका घेतली आहे. भारतीय संघ पाकिस्तानमध्ये खेळण्यासाठी जाणार नाही, तसेच पाकिस्तानी संघाला भारतात येण्याची परवानगी दिली जाणार नाही अशी मोठी घोषणा करण्यात आली आहे. तसेच आशिया चषक आणि आयसीसी सारख्या अनेक देशांचा सहभाग असलेल्या स्पर्धांबद्दलची भूमिकाही केंद्र सरकारनं स्पष्ट केली आहे. ज्यामध्ये अनेक देशांचा सहभाग असलेल्या स्पर्धा त्रयस्थ देशांत खेळवल्या जात असल्यास त्यात भारत सहभागी होऊ शकेल, अशी भूमिका केंद्र सरकारने घेतलेली आहे.

त्यामुळे येत्या आशिया चषकात भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याला मोदी सरकारकडून ग्रीन सिग्नल देण्यात आला आहे. थोडक्यात काय तर, भारताने आपल्या धोरणात कोणताही बदल केलेला नाही. आशिया चषक स्पर्धेत अनेक देशांचा सहभाग असतो. त्यामुळे भारतीय संघ या स्पर्धेत उतरेल. त्यामुळे भारत-पाकिस्तान यांच्यातील सामना केवळ आशिया चषक किंवा आयसीसी स्पर्धांमध्येच दिसेल, ही बाब स्पष्ट झाली आहे. पाकिस्तानचे संघ आणि खेळाडू सहभागी होत असलेल्या स्पर्धांमध्ये भारताचे संघ आणि खेळाडू सहभागी होतील. भारतात होणाऱ्या बहुराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पाकिस्तानी संघ आणि खेळाडूंना सहभागी होण्यास परवानगी देण्यात येईल, अशी माहिती क्रीडा मंत्रालयातील अधिकाऱ्यानं दिली.

आशिया चषकातील भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याचा मार्ग मोकळा

भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील आशिया चषकातील सामन्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कारण केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने दोन्ही देशांतील क्रिकेट सामन्यावर बंदी घालणं योग्य नसल्याचं म्हटले आहे. त्यासाठी कारण देताना क्रीडा मंत्रालयाने आशिया चषक ही स्पर्धा दोन देशांमध्ये नव्हे तर अनेक देशांमध्ये आहे, त्यामुळे या स्पर्धेतील भारत-पाक सामना रोखणं योग्य होणार नाही असे म्हटले आहे. जर केवळ दोनच देशांमध्ये क्रिकेट सामन्यांची स्पर्धा असती तर पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याला विरोधच असता असंही केंद्राने म्हटलं आहे.पहलगाममध्ये भारतीय पर्यटकांवर पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून झालेल्या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचे सर्व संबंध तोडले. त्याशिवाय पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्यासही नकार दिला आहे. मात्र आशिया चषक स्पर्धेत आशियातील अनेक देश सहभागी होत असल्यामुळे आता भारत आणि पाकिस्तान

# ब्रोंको टेस्ट काय आहे? भारतीय क्रिकेटपटूंना फिटनेससाठी आता द्यावी लागणार ही टेस्ट

नवी दिल्ली: भारतीय क्रिकेटमध्ये फिटनेसबाबत मोठा बदल करण्यात आला आहे. टीम इंडियाच्या वेगवान गोलंदाजांसाठी आता ब्रोंको टेस्ट एक मापदंड ठरणार आहे. भारतीय संघाचे स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक एड्रियन ले रॉक्स यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात आला आहे. अलिकडेच असे दिसून आले आहे की, भारतीय वेगवान गोलंदाज बऱ्याच काळापासून दुखापतींशी झुंजत आहेत. या वर्षी आयपीएलपूर्वी अनेक प्रमुख वेगवान गोलंदाजांना दुखापत झाली होती. आता त्यांचा स्टॅमिना वाढवण्यासाठी आणि त्यांना बराच काळ तंदुरुस्त ठेवण्यासाठी ही चाचणी अनिवार्य करण्यात येणार आहे. तर ही चाचणी नेमकी काय आहे? याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

काय आहे ब्रोंको टेस्ट?

भारतीय क्रिकेटपटूंचा फिटनेस आणखी चांगला व्हावा यासाठी बीसीसीआयने रग्बी खेळाडूंसाठी वापरण्यात येणारी ङ्गब्रोंको टेस्टफ क्रिकेटपटूंसाठी वापरण्याचा निर्णय घेतला आहे. या चाचणीत २० मीटर, ४० मीटर आणि ६०मीटर धावणे असे टास्क असणार आहेत. भारतीय क्रिकेटपटूंनी उच्च पातळीची तंदुरुस्ती राखावी आणि त्यांची एरोबिक क्षमता सुधारावी यासाठी यासाठी ही चाचणी सुरू करण्यात आली आहे.





अलीकडील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय गोलंदाजांची तंदुरुस्ती चिंतेचा विषय होती. मोहम्मद सिराज हा सर्व सामने खेळणारा एकमेव गोलंदाज होता. जसप्रीत बुमराह आणि आकाश दीप यांना विश्रांती द्यावी लागली. सराव सत्रादरम्यान अर्शदीप सिंगलाही दुखापत झाली. त्याच वेळी, बुमराहने दौऱ्यातील तिसऱ्या कसोटीदरम्यानही गती मंदावली. त्याचा वेग कमी झाला होता. अशा परिस्थितीत, प्रशिक्षक कर्मचाऱ्यांचा असा विश्वास आहे की, क्रिकेटपटू जिममध्ये जास्त वेळ घालवत आहेत. पण खरे आव्हान मैदानावर सतत धावणे आणि डावामागून डाव टाकणे हे आहे. या चाचणीमुळे वेगवान गोलंदाज दीर्घकाळ थकल्याशिवाय त्यांचा गोलंदाजीचा वेग राखू शकतील याची खात्री होईल.

ब्रोंको चाचणीपूर्वी क्रिकेटपटूंना दोन किलोमीटर धावण्याचा वेळ चाचणीत द्यावा लागत असे. वेगवान गोलंदाजांसाठी निर्धारित बेंचमार्क आठ मिनिटे १५ सेकंद आहे. तर फलंदाज, यष्टीरक्षक आणि फिरकीपटूंसाठी निर्धारित बेंचमार्क आठ मिनिटे ३० सेकंद आहे. म्हणजेच या वेळेच्या मर्यादेत दोन किलोमीटर धावणे ही चाचणी उत्तीर्ण होण्याची अट आहे.आतापर्यंत भारतीय संघाच्या फिटनेस चाचणीसाठी यो-यो चाचणी महत्त्वाची मानली जात होती. यामध्ये क्रिकेटपटूंना २०-२० मीटर अंतरावर ठेवलेल्या मार्करमध्ये सतत धावावे लागते. प्रत्येक ४० मीटर धावल्यानंतर १० सेकंदांचा ब्रेक असतो आणि वेग हळूहळू वाढतो. भारतीय संघासाठी किमान पातळी १७.१ निश्चित करण्यात आली होती. पण आता ब्रोंको चाचणी आल्यामुळे केवळ वेग किंवा चपळतेवर लक्ष केंद्रित केले जाणार नाही. तर क्रिकेटपटूंच्या लांब अंतरापर्यंत धावण्याच्या क्षमतेवर आणि सहनशक्तीवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. वेगवान गोलंदाजांसाठी हे विशेषतः कठीण ठरू शकते कारण त्यांना सामन्यात सतत वेगवान धावण्यासोबतच लांब स्पेलसाठी गोलंदाजी करावी लागते. यो-यो चाचणीमध्ये स्प्रिंट फिटनेस मोजला जात होता. तर ब्रोंको चाचणीमध्ये क्रिकेटपटूंची मैदानावर राहण्याची आणि लांब अंतरापर्यंत धावण्याची क्षमता तपासली जाणार आहे.

## लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना होणार जाहीर

**लातूर/प्रतिनिधी** :राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ जागा आणि त्याअंतर्गत सर्व पंचायत समित्यांच्या ११८ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे.

ही अधिसूचना लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने करण्यात येत आहे.

## बोरघाटात अवजड वाहनांना बंदी; जिल्हाधिकाऱ्यांचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटातून अवजड वाहनांना जाण्यास अखेर बंदी घालण्यात आलीय. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळं जीवितहानी टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातून आदेश काढण्यात आले आहेत. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबत विशेष आदेश काढले आहेत. या निर्णयामुळं घाटातील अपघातांचं प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

अवजड वाहनांना कायमस्वरूपी बंदी : मुंबई-पुणे एक्सप्रेस वेच्या खालापूर टोलनाक्यावरील टोल वाचविण्यासाठी अनेक जड वाहनचालक शेडुंग येथून बाहेर पडून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ म्हणजेच जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर जातात. खोपोलीपासून सुरू होणाऱ्या बोरघाटातून ते थेट पुन्हा एक्सप्रेस वेवर प्रवेश करतात. मात्र, या मार्गावर वाहनांची गर्दी वाढल्यामुळं गेल्या काही वर्षांत गंभीर अपघातांची मालिका सुरू होती. बोरघाट हा तीव्र चढणीचा व अवघड वळणांचा असल्यानं इंथ वारंवार अपघात घडले आहेत. अनेक निष्पाप प्रवासी, पर्यटक, छोट्या मुलांसह वाहनचालकांना आपला जीव गमवावा लागला. तसंच घाटात वाहतूक कोंडीही मोठ्या प्रमाणावर होत होती. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी थेट हस्तक्षेप करत अवजड वाहनांना कायमस्वरूपी बंदी घालण्याचा निर्णय घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रसिद्ध झालेल्या आदेशानुसार, खोपोली पोलीस स्टेशन तसंच परिवहन विभागाला तात्काळ सूचना देण्यात आल्या आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत कळविण्यात आलं असून, घाटातील नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आलेत. या निर्णयामुळं बोरघाटातील वाहतूक कोंडी कमी होणार असून प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. अपघात रोखण्यात मोठी मदत होईल आणि घाटात प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येतोय.

## पर्यायी बाजारपेठ शोधणार, अमेरिकेला आव्हान देणार; मुख्यमंत्र्यांनी आखला ॲक्शन प्लॅन

**मुंबई/प्रतिनिधी** : अमेरिकेने भारतातून आयात होणाऱ्या मालावर टॅरिफ लावून भारताला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, अमेरिकेने निर्माण केलेल्या आव्हानांना न घाबरता भारत देश आपली पावले टाकत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील त्याबाबत ॲक्शन प्लॅन आखला असून, आपल्या मालासाठी पर्यायी बाजारपेठ शोधून अमेरिकेनं लादलेल्या टॅरिफला इष्टापत्तीत परावर्तित करण्याचं नियोजन त्यांनी केलंय. जागतिक आयात निर्यात धोरणाच्या अनुषंगानं करण्यात येणाऱ्या उपाय योजनांबाबत गुरुवारी सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित बैठकीत मुख्यमंर्त्यानी ही माहिती दिली. या आपत्तीला संधी मानून राज्याच्या 'इज ऑफ डूईंग बिझनेस'मध्ये १०० बदल करावेत. 'इज ऑफ डूइंग बिजनेस' धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र 'वॉर रूम'ची निर्मिती करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिलेत. मुख्यमंत्री म्हणाले, 'इज ऑफ डूईंग बिझनेस'साठी स्थापन केल्या जाणाऱ्या वॉर रूमचा दर महिन्याला आढावा घेण्यात येईल. राज्यामध्ये खासगी औद्योगिक पार्कसाठी उद्योजकांना प्रोत्साहन दिले जाईल. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक वसाहतींच्या बाहेर अशा पद्धतीचं औद्योगिक पार्क विकसित करण्यासाठी स्पष्ट धोरण आणावे. यामध्ये लघु आणि मध्यम उद्योगांचा प्राधान्याने अंतर्भाव असावा. त्यातून उद्योजकांना उद्योगासाठी लागणारे परवाने तातडीने मिळतील, अशी व्यवस्था असावी. यामुळे राज्यात निश्चितच उद्योगांच्या माध्यमातून समृद्धी येऊन रोजगार निर्मितीमध्ये वाढ होईल.

# जगाला संताचे विचारच वाचवू शकतात - ह.भ.प. महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री

## शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगैरव सोहळा एक अविस्मरणीय समारंभ संपन्न






**लातूर/प्रतिनिधी** : जगद्गुरू तुकोबाराय त्या काळातील खरे पत्रकार होते. तुकोबारायांनी ज्या विषयाला स्पर्श केला त्या विषयाचा अभ्यास आज सर्व धर्मातील तत्त्ववेता आजपण करत आहेत. त्यांनी सर्व समाजाला एकत्र करण्यासाठी प्रयत्न केले त्यांच्या लिखाणातून क्रांती घडली असे प्रतिपादन शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. महंब महादेव महाराज बोराडे शास्त्री म्हणाले. यावेळी उद्घाटक माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, कळंब धाराशिवचे आ. कैलास घाडगे पाटील, माजी महापौर दिपक सुळ, छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना देशमुख, जेष्ठ पत्रकार रघुनाथ बनसोडे, संपादक भारत जाधव विचार मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना महाराज म्हणाले की, लिखान करणाऱ्याचे काम खुप मोलाचे असते म्हणूनच ज्या वेळी संताच्या विचाराने तरुण कर्म करू लागतील त्यावेळी ते विचार जगापुढे आदर्श ठरू लागतात. असे कर्म छत्रपती शिवाजी महाराजांनी करून दाखवले आहेत म्हणूनच जगाला संताचे विचारच वाचवु शकतात असे प्रतिपादन ह.भ.प. महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांनी आपल्या भाषणात केले.

यावेळी विनायराव पाटील म्हणाले की, या देशात लोकशाही आहे का असा प्रश्न पडत आहे सध्या न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारांनी प्रयत्न केला तरच लोकशाही वाचू शकणार आहोत या लोकशाहीत लोकांनी विचार करणे गरजेचे आहे असे म्हणाले. आ कैलास घाडगे पाटील म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यातून लातूरची निर्मिती झाली एका तालुक्याचा जिल्हा होतो आणि विकासात सर्वात पुढे जातो. विलासराव साहेबांचे नेतृत्व तुम्हाला लाभले, त्यामुळेच मोठा भाऊ मागे राहिला अन् लहान भाऊ पुढे गेला असे ते यावेळी म्हणाले.

दिपक सुळ म्हणाले की, बारा वर्षे पत्रकारिता क्षेत्रात टिकून राहणे सोपे नाही, पत्रकारितेच्या लेखणीची ताकद खूप मोठी आहे. आ. कैलास घाडगे पाटील जसे निष्ठावंत कार्यकर्ता होऊ शकतात तसाच मी पण अमितभैय्याचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे असे आपल्या अभ्यासु भाषणात म्हणाले. राज्यात सत्ताधाऱ्यांनी विरोधी पक्ष शिल्लक ठेवला नाही ती भूमिका छावा संघटनेला बाहेरून पार पाडावी लागते व माझ्यावर हल्ला झाला लातूरसह राज्यात तीव्र निषेध नोंदवला परंतु लोकशाही मानणारे आम्ही अण्णासाहेबांचे छावे आहोत असे परखड मत छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी यावेळी मांडले. प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडून न्याय देण्याची भूमिका या वृत्तपत्राने पार पाडली आहे यापुढेही रोखठोक भूमिका घेऊन आपण वाटचाल करावी अशी अपेक्षा करतो असे जेष्ठ पत्रकार रघुनाथ बनसोडे म्हणाले. पुरस्कारर्थीकडून सुधाकर तेलंग अध्यक्ष लातूर विभागीय शिक्षण मंडळ यांनी आपले विचार मांडले.

या शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यास गर्जा महाराष्ट्र माझा या गीताने व दिपप्रज्वलन करून सुरूवात झाली. तसेच जनतेच्या हक्काचं लातूर मिशन या गिताचा अनावरण सोहळा मान्यवराच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सौ. रेशमा गंभीरे सरपंच सिकंदरपूर, सुधाकर तेलंग अध्यक्ष लातूर विभागीय शिक्षण मंडळ, इसरार सगरे चेअरमन लातूर मल्टीस्टेट को. सोसायटी, डॉ. प्रो. आनंद पवार अधिष्ठाता कै. बी.व्ह. काळे आयुर्वेद महाविद्यालय, समाधान सुर्यवंशी क्षेत्रीय अधिकारी मनपा लातूर, सुनिल लाडके मंडळ अधिकारी बाभळगाव, ओमप्रकाश पवार उद्योजक मुरूड, दत्तात्रय परळकर संपादक समृद्ध व्यापार, सामना ढोल ताशा पथक लातूर यांना या वर्षीचा शिवरत्न पुरस्कार देवून गौरविण्यात आले. तसेच विशेष सत्कार सुरेश काचबावार, डॉ. बालाजी वाघमारे, प्रा. तानाजी घुटे, कुमार भालेराव, गीतकार राजन सरवदे यांचा करण्यात आला. यावेळी अनाथ व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला महिला वर्गासह प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक भारत जाधन यांनी केले तर सुत्रसंचलक बालाजी कांबळे यांनी केले शेवटी आभार दिपक बोराडे पाटील यांनी मानले.

यावेळी माधव गंभीरे, संतोष दगडे, दिपक नरवडे उपसंपादक परमेश्वर घुटे, जिल्हा प्रतिनिधी गणेश स्वामी, सल्लागार - गणेश होळे, सादिक शेख, कैलास साळुंके, श्रीराम गायकवाड, दयानंद माने, ईश्वर बद्दर, शंकर जाधव, अमित तिकटे, कैलास ढोले, गोविंद जगताप, मनोज चव्हाण, विष्णु शिंदे, महेश राठोड, उमेश भिसे, ज्ञानेश्वर सुर्यवंशी, तुकाराम जोगदंड, अनिल शेळके, केदार वांगसकर, संतोष मगर, लखन सावंत, अजित माने, आदित्य जाधव, यश दुटाळ, महालिंग तटाळे, दयानंद स्वामी ढवळे यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पर्यावरण संवर्धन व प्रदूषण या विषयांवर मार्गदर्शन व वृक्षारोपण कार्यक्रम





**लातूर/प्रतिनिधी** : पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार व केंद्रीय आणि राज्य प्रदूषण नियंत्रण बोर्ड अंतर्गत राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम विभागा मार्फेत लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील वायु, धुळ प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी अनेक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन आज दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी राजमाता जिजाऊ मनपा शाक्र.११, साळे गल्ली, लातुर येथे आयुक्त श्रीमती मानसी व अतिरिक्त आयुक्त तथा नोडल अधिकारी देविदास जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पर्यावरण संवर्धन व प्रदूषण या विषयांवर मार्गदर्शन व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमात विद्यार्थी व परिसरातील नागरीकांना वायू व धुळ प्रदूषणा बाबत मार्गदर्शन व उपाययोजना सांगण्यात आल्या व वृक्षारोपण करण्यात आले.

सदर कार्यक्रमास श्रीमती. गीतांजली कौशिक, सल्लागार, NCAP यांनी मार्गदर्शन केले सोबत मनपातील पर्यावरण संवर्धन अधिकार श्रीम.सन्मती मेस्त्री, शाखा अभियंता श्री. गणेश देवणीकर, NCAP विभागातील श्री. पंडीत लोहारे, मुख्याध्यापक श्री. वैभव बोंदर तसेच यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## आयशर वाहनांची भीषण धडक, दोन्ही वाहनांचा चक्काचूर, भयंकर अपघातात चालकाचा मृत्यू

**जळगाव/प्रतिनिधी** : जळगाव जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. चाळीसगावात दोन आयशर वाहनांची भीषण धडक झाल्याची घटना घडली आहे. ही धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांचा अक्षरश चक्काचूर झाला आहे. या अपघातात एका वाहन चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दुसरा वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

जळगावच्या चाळीसगाव शहरातील धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील भोरस फाट्याजवळ ही अपघाताची घटना घडली आहे. दोन आयशर वाहनांची एकमेकांना धडक बसल्याची ही घटना आहे. या अपघातात आयशर चालक सागर ताराचंद चव्हाण यांचा जागीच मृत्यू झाला आहे.या घटनेने एकच खळबळ माजली आहे.

# पूर्णवादी परिवाराने गौरव केलेल्या सर्वच महिला उपक्रमशील

## विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख यांचे प्रतिपादन




**लातूर/प्रतिनिधी** :जगात आपण समाजाचे काही तरी देणे लागतो. आपल्या आयुष्यात कोणत्याही कामाच्या माध्यमातून मदत केली तर त्या मदतीचा समाजाकडून गौरव होत असतो. पुर्णवादी परिवाराने गौरव केलेल्या सर्वच महिलांनी आपापल्या क्षेत्रात चांगली कामे केली आहेत. त्याचा समाजाला भविष्यात निश्चित फायदा होईल, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.

पुर्णवादी नारी फोरमच्या वतीने सति सौभाग्यवती मनकर्णिका माता यांच्या मंदीराच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २० ऑगस्ट रोजी औसा रोडवरील गायत्री उत्सव हॉलमध्ये आयोजित 'गौरव कर्तृत्वाचा' या कार्यकमात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख बोलत होत्या. यावेळी पूर्णवादी नारी फोरमच्या प्रमुख विभावरीताई कुलकर्णी, लातूर मनपा आयुक्त श्रीमत्ती मानसी मीना, लातूर पूर्णवादी नारी फोरमच्या अध्यक्षा अमिता अशोक गोविंदपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुर्णवादी परिवाराच्या वतीने समाजातील वंचितांसाठी काम करणाऱ्या महिलांचा सन्मान आयोजीत करण्यात आला होता. प्रारंभी प. पू. पारनेरकर महाराज यांच्या स्मृतीला अभिवादन करून पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी शशीकांत देशमुख व सौ. वृषाली देशमुख सुमधूर गायनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक गोविंदपूरकर यांनी करून पुर्णवादी नारी मंचच्या वतीने आयोजीत सन्मानाबाबतची भूमिका विषद केली. प. पू. पारनेरकर महाराज यांनी सामाजीक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्याची सूचना केली होती. त्यांच्या सूचनेवरूनच हा सन्मान सोहळा आयोजीत करण्यात आल्याचे गोविंदपूरकर यांनी सांगितले. यावेळी सौ. स्मितताई परचुरे, संध्याताई बारगजे व महापालिका आयुक्त मानसी मीना यांचा सन्मान पुर्णवादी परिवाराच्या वतीने सन्मानचिन्ह करण्यात आला. यावेळी महापालिका आयुक्त मानसी मीना, स्मितताई परचुरे व संध्याताई बारगजे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी पुर्णवादी परिवाराला प. पू. पारनेरकर महाराज यांच्या भगिनी विभावरी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन करताना म्हणाल्या, स्त्री ही देवीचे रूप असून कन्यापासून ते मातेपर्यंतचा प्रवास हा स्त्रीचे खरे रूप आहे. आज समाजात महिला शक्तीच्या माध्यमातून सामाजीक उपक्रमं करणाऱ्या महिलांचा सन्मान हा पुर्णवादी परिवारासाठी अभिमानाची व गौरवाची बाब आहे. पुर्णवादी परिवार हा सामाजीक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिला असून आजच्या काळात खऱ्या अर्थाने महिलांना सन्मानासोबत योग्य वागणुकीचीही गरज आहे. पुर्णवादी नारी फोरमच्या वतीने आयोजीत केलेला हा उपक्रम निश्चीतच आदर्शवत आहे. यावेळी त्यांनी पुर्णवादी परिवाराच्या वतीन सुरू केलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी पुर्णवादी नारी फोरमच्या वतीने विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, लातूर मनपाच्या आयुक्त श्रीमती मानसी मीना, महाराष्ट्र महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा श्रीमती तस्नीम पटेल, ज्येष्ट समाज सेविका श्रीमती संध्याताई बारगजे, ज्येष्ट समाजिक कार्यकर्त्या स्मितताई परचुरे, ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती सुनितताई अरळीकर यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी श्रीमती स्मितताई परचुरे, श्रीमती संध्याताई बारगजे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अशोक गोविंदपूरकर यांनी केले. सुत्रसंचालन अब्दुल गालिब शेख यांनी केले. टेकाळे यांनी आभार मानले. पूर्णानंदच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुमुख गोविंदपूरकर, संजय कुलकर्णी आदिंनी विशेष परिश्रम घेतले.

# मुंबई-सिंधुदुर्ग विमानसेवा सुरू होणार; तिकिटाचे ३ हजार २४० रुपये सरकार भरणार!


**मुंबई/प्रतिनिधी** : तांत्रिक कारणांमुळं बंद असलेली मुंबई - सिंधुदुर्ग विमानसेवा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, गणेशोत्सवाआधीच कोकणवासियांना बाप्पा पावला आहे. विशेष म्हणजे, सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात ही सेवा पुन्हा सुरू केली जाणार आहे. अतिरिक्त शुल्काचा भुर्दंड राज्य सरकार उचलणार असून, या मार्गावरील तिकिटाचे प्रतिसीट ३ हजार २४० रुपये शासनातर्फे विमान कंपन्यांना दिले जाणार आहेत.

नुकत्याच झालेल्या राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई-चिपी (सिंधुदुर्ग)-मुंबई हवाई मार्गासाठी प्रति आसन व्यावहारिक तूट निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, हा निधी नेमका किती असेल, याबाबत स्पष्टता नव्हती. सामान्य प्रशासन विभागानं त्याबाबत शासन निर्णय काढून स्पष्टता आणली आहे. १२ ऑगस्ट रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सोलापूर-पुणे-मुंबई हवाई मार्गासाठी राज्य शासनाकडून १०० टक्के व्यावहारिक तूट निधी (व्हायॅबिलिटी गॅप फंडिंग) देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तोच नियम सिंधुदुर्ग ते मुंबई हवाई प्रवासासाठी लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. केंद्र सरकारनं सामान्य माणसांना विमानप्रवास परवडला पाहिजे, यासाठी 'उडान' योजना (रिजनल कनेक्टिव्हिटी स्कीम) सुरू केली आहे. याच योजनेअंतर्गत चिपी-मुंबई हवाई मार्ग सुरू करण्यासाठी केंद्रीय नागरी विमानन मंत्री राममोहन नायडू किंजरापु यांनी राज्य सरकारकडं व्हायॅबिलिटी गॅप फंडिंग म्हणजेच आर्थिक तूट भरून काढण्यासाठी निधी देण्याची विनंती केली होती. त्यानुसार, चिपी-मुंबई हवाई मार्गासाठी १०० टक्के व्यावहारिक तूट निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूर विमानतळासाठी अलिकडेच मंजूर केलेल्या योजनेनुसार सर्व अटी शर्ती चिपी विमानतळाला लागू राहणार आहे.

व्यावहारिकता तूट म्हणून चिपी-मुंबई हवाई मार्गावरील विमान सेवेसाठी प्रति आसन ३ हजार २४० रुपये दरानं निधी उपलब्ध करून दिला जाईल. यामुळं या मार्गावरील तिकिटाचे दर कमी होण्यास मदत होणार आहे. जी कंपनी सेवा सुरू करण्यास पात्र ठरेल, त्या कंपनीला दर आसनामागे हा निधी उपलब्ध करून दिला जाईल. त्साठी १७ कोटी ९७ लाख रुपयांची तरतूद केली जाणार आहे. या विमानतळासाठी उडान योजना लागू झाल्यानंतर शासनाकडून देण्यात येणारा हा निधी बंद केला जाईल. त्यानंतर केंद्र शासनाच्या उडान योजनेप्रमाणे २० टक्के व्यवहारिकता तूट दिला जाईल.

''सिंधुदुर्ग येथील चिपी विमानतळाची सेवा काही दिवसांपासून तांत्रिक अडचणींमुळे बंद आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे खासदार तथा माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा केला. हे विमानतळ 'व्हायबलीटी गॅप फंडिंग' अंतर्गत सुरू करण्यासाठी त्यांनी केंद्राची परवानगी घेतली.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९

# श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा अलोट भाविकांच्या उपस्थितीत थाटात संपन्न

## टाळ-मृदंगाची साथीने, भक्तीमय वातावरणात पालखी ग्राम भ्रमणाणे यात्रेचे सांगता





मुरूम (रामलिंग पुराण)-उमरगा तालुक्यातील मुरूम येथे श्रावण मासात ग्रामदैवत श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन महोत्सव थाटात संपन्न झाला.प्रतिवर्षा प्रमाणे यात्रेनिमित्र जिल्हा बँकेचे चेअरमन बापूराव पाटील यांच्या मार्गदर्शनार्थ, युवानेते प्रशांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली- शिवमहापुराणाचे आयोजन करण्यात आले होते. पुराण प्रवचक: षष्टस्थल प्रबोधक पूज्य श्री अन्नदानेश्वर स्वामीजी यांच्या मधुरवाणीने संगीतकार :- गानरत्न अशोकय्या हिरेमठ तबलावादक :- अशोक पट्टारा यांच्या संगीत साथीने दि. २८ जुलै ते २० ऑगस्ट पर्यंत शिवमहापुराण सोहळा पार पडला याप्रसंगी असंख्य महिला भगिनीं, भावीक भक्तांनी पुराणाचे लाभ घेतले. दि. २१ वार गुरुवार रोजी श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखीचे ग्राम भ्रमणानंतर यात्रेचे सांगता संपन्न झाले.

दि.२० रोजी रात्री १२ वाजून १० मिनिटाला अग्नी पेठवण्यात आले, सकाळी अतिशय भक्तिमय वातावरणात विधिवत पूजन संपन्न झाल्यानंतर पालखी पुरंत आणि सदभक्तांच्या उपस्थित अग्नी प्रवेश झाला. प्रारंभी श्री हनुमान चौकातून पालखी ग्राम प्रदक्षिणा साठी सुरुवात झाले. अतिशय भक्तिमय वतातवरणात पुरंत यांचे पारंपारिक खेळी, विविध भजने मंडळे, विविध समाजाचे नंदी कोलचा उत्स्फूर्तपणे सहभाग होता. ग्रामदैवत श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा बापूराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२१ वार गुरुवार रोजी जल्लोषात संपन्न झाले, सकाळी दहा वाजता श्री. कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखी अग्नी प्रवेश करून नगर प्रदक्षिणास सुरुवात झाली. श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखीत असंख्य भाविक भक्तीत तल्लीन झाले होते. अष्टगी,लोणी, भोसगे परिवाराच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे त्यांच्या घरून वाजत गाजत कुंभ कळस घेऊन आले. प्रारंभी अग्नी प्रवेशा नंतर हनुमान चौकात श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यांच्या पालखीचे भक्तिमय वातावरणात व पुरंत खेळून पूजन संपन्न झाले त्यानंतर पालखी नगर प्रदक्षिणा साठी निघाली, यादरम्यान असंख्य महिला भगिनी डोक्यावर कुंभकळस घेऊन ग्रामप्रदक्षिणा मध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. त्याच बरोबर मुरूम शहरातील मातंग,परीट, सुतार समाजाचे मानाचे दिंडीचाही उत्साहात सहभाग झाला होता, शहरातील विविध भजनी मंडळानेही पालखीत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला, शहरातील सोनार गल्ली, अशोक चौक, भाजी मंडई, डोंगरे गल्ली,टिळक चौक, किसान चौक, सुभाष चौक,गांधी चौक या पालखी मार्गावर भाविक भक्तांनी रांगोळीने व त्याच बरोबर पालखी पूजन करून व पालखी वर पुष्पवृष्टी करून ठिकठिकाणी स्वागत केले, डोंगरे परिवाराच्या वतीने भक्तासाठी दुधाचा प्रसादाचे वाटप केले, गांधी चौकात दुर्गे परिवाराच्या वतीने चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती, मंदिर समितीच्या वतीने प्रदक्षिणा दरम्यान सदभक्तांना अल्पउपहार, पाण्याची सोय करण्यात आली होती. टाळ, मृदंग, ढोल-ताश्यानी भक्तिमय वातावरणात श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन जयघोषाणे मुरूम नगरीतुन पालखी सोहळा हजारो नागरिकांच्या सहभागाने संपन्न झाले. सुभाष चौकातून पालखी गांधी चौकाकडे मार्गस्थ झाले यावेळी धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन बापुराव पाटील यांनी श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखीचे दर्शन घेतले. कपिलेश्वर मंदिर देवस्थानच्या वतीने श्री.कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त दरवर्षी पुराणाचे आयोजन केले जाते, पालखी प्रदक्षिणा नंतर यात्रा महोत्सवाचे सांगता संपन्न झाले.

अतिशय भक्तिमय वातावरणात श्री.कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रा उत्साहात संपन्न झाले, यात्रा व संपूर्ण सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मंदिर समिती अध्यक्ष प्रशांत पाटील मित्र मंडळाच्य वतीने परिश्रम घेतले.शरण पाटील फौंडेशनच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पालखी प्रदक्षिणा नंतर हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

लातूर समाचार उस्मानाबाद
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## अतिवृष्टीमुळे तालुक्यातील माणकेश्वर मंडळाला फटका



भूम(प्रतिनिधी)-तालुक्यातील पाच महसूल मंडळांपैकी चार मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद स्कायमेटव्दारे झाल्याचे अधिकारी सांगत आहेत. मात्र माणकेश्वर महसूल मंडळात तुलनेने पावसाची नोंद कमी झाल्याचे स्कायमेटने दाखवले जात आहे. कारण, तालुक्यातील पर्जन्यमापक यंत्रणा 'स्कायमेट'वर आधारित असल्याने माणकेश्वर मंडळांतील शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या शेतात पिके पाण्याखाली गेली, नदी-नाल्यांना पूर आला, रस्ते वाहून गेले, घरांना भगदाड पडले. तरीही स्कायमेट यंत्रणा कमी पाऊस दाखवत असल्याने महसूल विभागाच्या नोंदीत अतिवृष्टीचा उल्लेख नाही. परिणामी या भागातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपासून वंचित राहावे लागणार अशी भीती शेतकऱ्यांना वाटू लागली आहे. शेतकरी सांगतात की, आमच्या शेतात सोयाबीन, मूग, तूर पाण्यात वाहून गेली. पण पर्जन्यमापक कमी पाऊस दाखवत असल्याने आम्हाला मदत मिळण्यास अडचण होणार आहे.

प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, पावसाचे प्रमाण नोंदवण्यासाठी स्कायमेट ही खासगी यंत्रणा वापरली जाते. या नोंदींच्या आधारे राज्य सरकारकडे अहवाल सादर केला जातो. मात्र या नोंदी वास्तव परिस्थितीशी विसंगत असल्याने शेतकऱ्यांचा विश्वास बसत नाही. याबाबत माणकेश्वर मंडळातील शेतकऱ्यांची मागणी आहे की, प्रत्यक्ष पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी. तसेच पर्जन्यमापक यंत्रणेतील त्रुटी दूर करण्याची मागणी होत आहे.

## कळंब बस स्थानकावर कायदेविषयक शिबिर संपन्न



कळंब (प्रतिनिधी)- येथील बस स्थानकावर गोर - गरीब जनतेसाठी कायदा माहित व्हावा या उद्देशाने तालुका विधिज्ञ मंडळाच्या वतीने न्याय आपल्या दारी या योजनेमधून जिल्हा विधीसेवा प्राधिकरण धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने कळंब बस स्थानकावर विधी सेवा प्राधिकरण कायदेविषयक माहिती ,जेष्ठ नागरिकांचे अधिकार ,कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा व रॅगिंग अशा विविध कायद्यांचा जनजागृती संदर्भात मान्यवरांनी प्रबोधन केले .

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आगारप्रमुख एस . डी . खताळ या कार्यक्रमासाठी न्यायालयाचे वरिष्ठ लिपिक पी . एस . पारवे ,ए . यु . लोकरे ,आसिम मुल्ला ,ज्येष्ठविधीज्ञ त्रिंबक मनगिरे ,प्रवासी मित्र संघटनेचे प्रा . मोहन जाधव, स्थानक पोलीस संतोष इंगळे यांनी कायदेविषयक ज्ञान सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत सांगितले .या कार्यक्रमासाठी कार्यशाळा अधीक्षक बालाजी भारती , सहाय्यक वाहतूक निरीक्षक अभिजीत धाकतोडे, प्रभाकर झांबरे ,वाहतुक नियंत्रक प्रशांत नानजकर , नामदेव जगताप ,गोविंद जाधवर ,ए .वाय . पठाण , हनुमंत मुंडे ,विलास जाधव , कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गणेश गोरे यांनी केले तर महिला कर्मचाऱ्यांमध्ये श्रीमती अलका भोसले , प्रियंका शिंदे, अनुराधा पवार , तरमिम शेख, अश्विनी तिडके,वंदना पालके,संध्या कुमठेकर; राजकन्या गवळी सह आदी नी पारिश्र घेतले .

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## तापेसह विषाणूजन्य आजारांमध्ये वाढ; व्हायरल इन्फेक्शनमुळे रुग्णांची गर्दी

### रुग्णालयात ८ दिवसांत २६४५ रुग्ण



उमरगा (प्रतिनिधी)- मागील चार दिवसांपासून झालेल्या आणि होत असलेल्या पावसामुळे सर्दी, ताप व श्वसन यासह विषाणूजन्य आजारात वाढ झाली आहे. सरकारी व खाजगी रुग्णालयात बहुतांश रुग्ण सर्दी, ताप, डोके दुखणे आदी आजारांचे लक्षणे आहेत.

मागील काही दिवसांपासून शहरासह परिसरात पावसाची हजेरी लागली आहे. दिवसात काही तासापूरतेच सूर्यदर्शन होत आहे. अधूनमधून पडणारे ऊन आणि लगेच ढगाळ वातावरणाने गायब होत आहे. पावसाने वातावरणात गारवा वाढला असल्यामुळे श्वसनाचे आजार वाढलेले आहेत. गारव्यामुळे अनेकांना डोकेदुखीचा त्रास होतो. अचानक अंगात ताप भरून येणे हा प्रकार होत आहे. शिवाय अनेक वेळा तापीचे कारण न समजल्याने आजार गंभीर रुप धारण करतात. विशेषतः लहान मुलांची या काळात अधिक काळजी घ्यावी लागते.

सकाळी उठल्यावर कोमट पाणी प्यावे,घरा बाहेर जाताना कान, नाक बंद ठेवण्यास स्कार्फ,मास्क रुमाल वापरा, बाहेरचे तेलकट पदार्थ खाऊ नये. तुळस, सुंठ, दालचिनी आणि हळदीचा काढा घ्यावा, कोणतेही थंड पदार्थ खाऊ नये, थंड पेय घेणे टाळावे. विविध भाज्यांचे गरम सूप घ्यावे, आजारी मुलांना शाळेत पाठवू नये, पावसामुळे मुलांना विषाणूजन्य सर्दी व तापीचा त्रास होत आहे. मुले शाळेत गेल्यानंतर शेजारी बसलेल्या मुलांना देखील हवेतून विषाणूजन्य संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे आजारी मुलांना बरे होईपर्यंत शाळेत पाठवू नये. असेही डॉक्टर सांगतात.

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महेश महाराज यांचे प्रतिपादन

### संत सेना महाराजांची भक्ती महान, त्यांच्या हृदयी परमात्मा विराजमान



उमरगा(प्रतिनिधी)-संत सेना महाराज यांची भक्तीमहान होती, त्यांचे ह्रदयी भगवान परमात्मा विराजमान झाले होते. साधू संताचे संगतीत गेलो की सहज भगवंत हाती लागतो. नाभिक समाज शस्त्र अन् शास्त्र मानणारा समाज आहे. असे प्रतिपादन महेश पाटील महाराज यांनी केले.

श्री संत शिरोमणी संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दोन दिवशीय धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. या सोहळ्यात बुधवारी (२०) दुपारी बारा वाजता कीर्तनाच्या समारोपात गुलाल पुष्पवृष्टी करण्यात आली. श्री संत सेना महाराज मंदिरात मंगळवारी (१९) रात्री महेश पाटील महाराज हिप्परगेकर यांची किर्तन सेवा झाली. दुधाराम क्षीरसागर, बालाजी महाराज कोळसूरकर यासह श्री संत सेना महाराज महिला भजनी मंडळ उपस्थित होते.

दरम्यान बुधवारी सकाळी जयंत अविनाश काळे यांच्या हस्ते महाभिषेक करण्यात आले. सकाळी दहा वाजता कराळी आगजप्पा महाराज संस्थानचे तेजनाथ महाराज शास्त्री यांची किर्तन सेवा झाली. दुपारी बारा वाजतागुलाल पुष्पवृष्टी अन् महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी खासदार प्रा.रविंद्र गायकवाड, माजी नगराध्यक्ष रज्जाक अत्तार, माजी नगरसेवक पंढरीनाथ कोणे, सामाजिक कार्यकर्ते अनिल सगर, भिम महाराज मुळजकर, सदानंद शिवदे-पाटील यांचे हस्ते श्री संत सेना महाराज, विठ्ठल-रुक्मिनी मूर्तीचे पुजन करण्यात आले. श्री संत सेना महाराज मंदिर ट्रस्ट अध्यक्ष अविनाश काळे, प्र.प्राचार्य डॉ.संजय अस्वले, केशवराव काळे, बालाजी काळे, बलभीम ढगे, आनंदराव काळे, अनिल लोखंडे, उमेश काळे, जितेंद्र काळे, ओम मुळे, सोमनाथ काळे, सारंग सोमवंशी, नागेश मुळे, गोरख सुरवसे, बालाजी माने, यश काळे, रवी मुळे, अशोक सुर्यवंशी, गोपाळ आतकरे, कृष्णा काळे आदी ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी यशस्वितेसाठी पुढाकार घेतला.

किर्तनातून संतसेना महाराजांची महती : संतसंगतीने थोर लाभ झाला, मोह निरसला मायादिक, घातले बाहेरा काम क्रोध वैरी, बैसला अंतरी पांडुरंगा.दुजियाचा वारा लागूं नेदी अंगा । ऐसे पांडुरंगा कळो आले।। संतांनीं सरता केला सेना न्हावी । ब्रह्मादिक पाही नातुडे जो ।। या अभंगातून शास्त्री महाराज यांनी श्री संत सेना महाराज यांच्या अभंगावर अतिशय सुंदर चिंतन मांडून मंत्रमुग्ध केले. यावेळी दामू चव्हाण, दामू मुगळे यांसह बालभजनी मंडळ उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649